# मराठी ब्लॉग्ज : एक अभ्यास

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग

## लघु शोधनिबंध

# मराठी ब्लॉग्ज : एक अभ्यास

संशोधक : सिद्धाराम भै. पाटील

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. रवींद्र चिंचोलकर**

**पदव्युत्तर पत्रकारिता आणि जनसंज्ञापन**

**२०१० - २०११**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सिद्धाराम भैरप्पा पाटील यांनी वर्ष २०१०-२०११ मध्ये सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत पत्रकारिता व जनसंज्ञापन पदव्युत्तर अभ्यासक्रमातील अनिवार्य असलेला लघुशोधनिबंध 'मराठी ब्लॉग्ज : एक अभ्यास' या विषयावर माझे मार्गदर्शनाखाली परिश्रमपूर्वक पूर्ण केला आहे.

ठिकाण :

दि.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. रवींद्र चिंचोलकर

विभाग प्रमुख,

पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग,

सोलापूर विद्यापीठ.

# प्रतिज्ञापत्र

मी सिद्धाराम भैरप्पा पाटील सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की, ‘मराठी ब्लॉग्ज : एक अभ्यास’ या विषयावरील शोधप्रबंध प्रा. डॉ. रवींद्र चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे.

‘मराठी ब्लॉग्ज : एक अभ्यास’ हा विषय माझा असून, इतरत्र कोणत्याही विद्यापीठात तो याआधी सादर केलेला नाही. या प्रबंधासाठी आवश्यक असणारे सर्व संदर्भ मी स्वत: प्राप्त केले आहेत, म्हणून मी प्रतिज्ञापत्र लिहून देतो.

दि.

## संशोधक

सिद्धाराम भैरप्पा पाटील
पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग,
सोलापूर विद्यापीठ.

# ऋणनिर्देश

'मराठी ब्लॉग्ज : एक अभ्यास' या विषयावरील प्रबंध सादर करताना मला आनंद होत आहे. जनसंवादातील एक महत्त्वाचे माध्यम म्हणून ब्लॉग माध्यम लोकप्रिय होत आहे. इंटरनेट वापरू शकणाऱ्या सर्वांसाठी खुले असणारे हे माध्यम म्हणजे जनतेचे हक्काचे आणि मोफत माध्यम आहे. यापुढे ब्लॉगचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच जाईल यात शंका नाही. मराठी भाषेतूनही ब्लॉग लिहिता येतं आणि आता मराठीतही ब्लॉग संकल्पना चांगलीच स्थिरावत चालली आहे. या पार्श्वभूमीवर 'मराठी ब्लॉग : एक अभ्यास' असा विषय लघुशोधप्रबंधासाठी निवडला. विषय निवडीपासून आमचे आदरणीय मार्गदर्शक डॉ. रवींद्र चिंचोलकर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले आहे.

सुरुवातीला मनात संभ्रमावस्था होती, मात्र श्री. चिंचोलकर सरांच्या मार्गदर्शनामुळे आत्मविश्वास येत गेला. इंडियन एक्सप्रेसच्या 'आय' पुरवणीतील ब्लॉग विशेषांकामुळे आणि लोकसत्ताच्या लोकरंग पुरवणीतील लेखामुळे प्रबंध सुरु करायला आधार मिळाला. शिवाय मराठी ब्लॉगवरील अनेक ब्लॉगर्सनी प्रश्नावलीला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन मोलाची माहिती दिली. प्रा. देवानंद गडलिंग, प्रा. बाबूराव माने, संकुलप्रमुख डॉ. अशोककुमार यांचेही प्रोत्साहन मिळत गेले. त्यामुळे या ठिकाणी वरील सर्वांचे ऋण व्यक्त करतो.

संशोधक

सिद्धाराम भैरप्पा पाटील

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र | ३ |
| | प्रतिज्ञापत्र | ४ |
| | ऋणनिर्देश | ५ |
| | अनुक्रमणिका | ६ |
| | मनोगत | ९ |
| | **प्रकरण १ ले** | |
| १.१ | प्रस्तावना | १० |
| १.२ | विषयाची निवड | १२ |
| १.३ | पूर्वसुरींचा अभ्यास | १३ |
| १.४ | संदर्भ सूची | १५ |
| | **प्रकरण २ रे** | |
| २.१ | प्रस्तावना | १६ |
| २.२ | संशोधन म्हणजे काय? | १७ |
| २.३ | संशोधनाची उद्दिष्टे | १८ |
| २.४ | गृहित कृत्ये | १९ |
| २.५ | संशोधन पद्धती | २१ |
| २.६ | आशय विश्लेषण | २२ |
| २.७ | संशोधन आराखडा | २३ |
| २.८ | संकल्पना | २४ |
| २.९ | संदर्भ सूची | २६ |

| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | | |
| | **प्रकरण ३ रे** | |
| ३.१ | ब्लॉगचा इतिहास | २७ |
| ३.२ | मराठी ब्लॉगची वाटचाल | २९ |
| ३.३ | संदर्भ सूची | ३२ |
| | **प्रकरण ४ थे** | |
| | **महाविद्यालयीन तरुणांच्या सर्वेक्षणाचे विश्लेषण** | |
| ४.१ | प्रस्तावना | ३३ |
| ४.२ | निष्कर्ष | ३४ |
| | **प्रकरण ५ वे** | |
| | **आशय विश्लेषण** | |
| ५.१ | प्रस्तावना | ४२ |
| ५.२ | ब्लॉग अभ्यासाचे निष्कर्ष | ४३ |
| ५.३ | ब्लागर्सच्या अभ्यासाचे निष्कर्ष | ४९ |
| | **प्रकरण ६ वे** | |
| | **निष्कर्ष आणि शिफारसी** | |
| ६.१ | निष्कर्ष | ५३ |
| ६.२ | शिफासी | ५५ |

| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | | |
| | **प्रकरण ७ वे** | |
| | **परिशिष्ट्ये** | |
| ७.१ | सर्वात जुना उपलब्ध मराठी ब्लॉग | ५६ |
| ७.२ | शेतीविषक ब्लॉग | ५७ |
| ७.३ | मराठी ब्लॉग विश्व | ५८ |
| ७.४ | प्रश्नावली | ५९ |
| ७.५ | ब्लॉगर्सची माहिती | ६१ |

# मनोगत

कोणत्याही देशाचे भवितव्य हे त्या देशातील तरुणांच्या ओठावर कोणत्या प्रकारची गाणी आहेत यावर अवलंबून असल्याची विस्टन चर्चिल यांची उक्ती प्रसिद्ध आहे. यात तथ्यही आहे. जगातल्या साऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचे चरित्र पाहिले तर एक बाब स्पष्ट होते की, या व्यक्तींनी आपल्या वाटचालीची सुरुवात तरुणपणीच केली होती. थोडक्यात काय तर कोणत्याही समाजातील तरुणांचा कल समजून घेणे ही महत्त्वाची बाब ठरते.

संवाद क्षेत्रात क्रांती झाली आहे. इंटरनेट आणि त्यासंबंधीच्या तंत्रज्ञानाने जगावर एक ठसा उमटविला आहे. असे कोणतेही क्षेत्र राहिले नाही की, ज्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या संगणक आणि इंटरनेटशी संबंध नाही. आजची युवा पिढी ही इंटरनेटशी समरस झाली आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. ई-मेलचा वापर, ट्वीटर, आर्कुट, फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंगचा वापर या गोष्टी तरुण पिढीने केव्हाच आत्मसात केल्या आहेत. जणु या गोष्टी दैनंदिन गरजेच्याच बनल्या आहेत.

ब्लॉग हे इंटरनेटवर सहज उपलब्ध असलेले, अत्यंत प्रभावी आणि मोफत असे संवादाचे माध्यम आहे. प्रादेशिक भाषांतूनही ब्लॉगलेखन करता येते. अत्यंत अलीकडच्या काळात समोर आलेले हे माध्यम अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम बनले आहे. आज मराठीतून ब्लॉग लेखन करणाऱ्यांची संख्या मर्यादित आहे हे खरेच. ब्लॉग लिहिणाऱ्यांची संख्या मर्यादित असली तरी ब्लॉग वाचणाऱ्यांची संख्या मात्र मोठी आहे. तरुणाईने 'ब्लॉग'ला स्वीकारलं आहे. ब्लॉग हे व्यक्तिमत्त्व विकासाचंही माध्यम आहे. ब्लॉगने तरुणाईच्या प्रतिभेला, सर्जनशीलतेला नवं आकाश खुलं करून दिलं आहे. ब्लॉग हे एक शक्तिशाली माध्यम आहे. प्रस्तुत संशोधक गेल्या तीन वर्षांपासून मराठीतून ब्लॉग लेखन करीत आहे. ब्लॉगशी असलेली ही मैत्रीच मराठी ब्लॉग्जचा अभ्यास करण्यासाठी खुणावतेय. म्हणूनच मराठी ब्लॉग्जचा अभ्यास करण्याचा हा प्रयत्न...

# प्रकरण १

## १ /१ प्रस्तावना

***ब्लॉग म्हणजे स्वत:ची थोडी वेगळी वैशिष्ट्ये असलेली एक प्रकारची वेबसाईट म्हणता येईल.***

**(*१)**

वेबसाईट बनविण्यासाठी काही खर्च येतो तर ब्लॉग ही विनामूल्य सेवा आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर ब्लॉग ही आपली इंटरनेटवरील नोंदवहीच समजा. ती इंटरनेटवर असल्यामुळे आपल्या नोंदी इतरांपर्यंत पोचविण्याची तिथे सुविधा असते. या अत्याधुनिक नोंदवहीमध्ये (ब्लॉगमध्ये) छायाचित्रे आणि व्हिडिओ क्लिप्स साठविण्याचीही सुविधा असते. गूगलसारख्या सर्चइंजिनवरही ज्या त्या विषयानुसार ब्लॉग्जचे लिंक उपलब्ध होऊ शकत असल्याने अनोळखी व्यक्तीही आपल्या ब्लॉगवरील हवी ती माहिती वाचू शकते.

एखादी वेबसाईट बनवायची असल्यास - सॉफ्टवेअर्सचा वापर करावा लागतो, वेबसाईटचे डिझाईन, लेआऊट, आराखडा, लिंक्सची रचना इत्यादी बऱ्याच गोष्टींचा विचार करावा लागतो. परंतु ब्लॉगचे तसे नाही. ब्लॉगमधील सर्वच गोष्टी सोप्या असतात. ब्लॉग्जसाठी वेगवेगळे तयार आराखडे असल्याने ब्लॉग बनविणे फार सोपे असते.

ब्लॉगच्या माध्यमातून एखाद्या वेबसाईट प्रमाणे आपल्याला हवी असलेली माहीती इंटरनेटवर ठेवणे शक्य असते. ब्लॉग्जचा वाचक ब्लॉगवरील लेख (मजकूर), छायाचित्र, व्हिडिओ यासंबंधी आपली टिपणी त्या ठिकाणी करू  शकतो. मराठी भाषेतूनही ब्लॉग आहेत. मराठी भाषेत सुमारे तीन हजाराहून अधिक संख्येने ब्लॉग्ज आहेत. मोठ्या शहरांमध्ये आणि ठराविक व्यवसायामध्ये असलेल्या मंडळींनाच संगणक आणि इंटरनेट सहजपणे उपलब्ध असल्यामुळे ठराविक लोकच ब्लॉगलेखन करण्यात अग्रेसर आहेत. त्यामुळे विषयांच्या विविधतेला मर्यादा आल्या आहेत. मराठी ब्लॉग्ज हे केवळ 'युनीकोड' प्रकारचे फाँट वापरूनच बनविता येत असल्यामुळे मराठी ब्लॉगचा प्रसार जेवढा व्हायला पाहिजे तेवढा होऊ शकला नाही.

ब्लॉग म्हणजे गंम्मत म्हणून लिखाण असे स्वरूप सुरुवातीला असणे स्वाभाविक असले तरी आता हळूहळू ब्लॉग्ज हे प्रगल्भ होत आहेत. स्वत:च्या कक्षा रुंदावणारं हे माध्यम आहे. ब्लॉगलेखक हा एक स्वत:च्या विश्वाचा छोटा मीडिया पब्लिशरच आहे. मराठीत असणाऱ्या ब्लॉग्जची नेमकी संख्या व त्यावरील विषय यांची नोंद घेणारी कोणतीही यंत्रणा आजतरी नाही. ब्लॉग्जवरून सकस साहित्यनिर्मिती व्हावी यासाठी साहित्य परिषद अथवा महाराष्ट्र शासन सजग असल्याचेही दिसत नाही. मराठी बॉग्जची वाटचार अद्याप बाल्यावस्थेत आहे. आता कुठे ब्लॉगर्सचे मेळावे होऊ घातले आहेत.

*''ब्लॉग हा एकट्याला लिहिता येतो, दोघांना लिहिता येतो आणि अनेकांना मिळूनही लिहिता येतो. एकाच वेळी जगातल्या चार कोपऱ्यात हजारो मैल दूर असताना ब्लॉगच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात राहून ब्लॉग लिहिला जाऊ शकतो. जगातील कोणालाही कुठेही आणि केव्हाही तो वाचता येतो. एका ब्लॉगमधील किंवा एकाचवेळी लाखो ब्लॉग्जमधील विशिष्ट विषयाचे संदर्भ क्षणार्धात गुगल (क्रियापद) करून शोधता येतात. व्यक्तीबरोबर संस्था आणि सरकारी ब्लॉग्जही असतात. चित्रपट, ध्वनिप्रसारण, छायाचित्रे आणि त्याला तात्काळ परस्परसंपर्काच्या (इंटॅरॅक्टिव्हिटी) क्षमतेची जोड या वैशिष्ट्यांमुळे ब्लॉग हे माध्यम ज्ञानप्रसारणाच्या क्षमतेत पारंपारिक ज्ञानकोशाला मागे टाकू शकतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे अगदी सामान्यातल्या सामान्य माणसाच्या आवाक्यातलं हे माध्यम आहे. स्वतंत्र संकेतस्थळ आणि ब्लॉग यांच्यातला फरक स्वतंत्र बंगला आणि टू बेडरूम किचन फ्लॅट असा आहे. ब्लॉगच्या माध्यमात देवकीला झालेल्या आठव्या पुत्राची ताकद आहे. फक्त हे बाळ आज रांगतं आहे. किशोरवयात एखाद्या कालियाचं मर्दन त्याने केलं की, ते लक्ष वेधून घेईल. या जगाच्या तोंडून गीता वदवण्याची कुवतही त्याच्यात उद्या असेल. हे आपण आजच ओळखलेलं बरं...''*

**(*२)**

# १/२ विषयाची निवड

आज जे मराठीतून ब्लॉग्ज उपलब्ध आहेत ते गूगल कंपीनीच्या ब्लॉगर डॉट कॉममुळे किंवा वर्डप्रेस डॉट  कॉममुळे. नव्या पिढीतील उमलते लेखक आणि पत्रकार यांच्या ब्लॉग्ज सर्रास पहायला मिळतात. विविध विषयातील तज्ज्ञांचेही ब्लॉग्ज आहेत. यापुढे ब्लॉगचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच जाईल यात शंका नाही. मराठी भाषेतूनही ब्लॉग लिहिता येतं आणि आता मराठीतही ब्लॉग संकल्पना चांगलीच स्थिरावत चालली आहे. ब्लॉग हे एक प्रभावी माध्यम म्हणून पुढे येत असल्यामुळे 'मराठी ब्लॉग : एक अभ्यास' असा विषय लघुशोधप्रबंधासाठी निवडला. हजारोंच्या संख्येने असणाऱ्या ब्लॉग्जचा मर्यादित वेळेत अभ्यास करणे ही बाब तशी अशक्य कोटीतलीच म्हटली पाहिजे. प्रस्तुत संशोधकाला ब्लॉगिंग करीत असताना मराठी ब्लॉग विश्व या संकेतस्थळाची माहिती मिळाली. मराठी ब्लॉग विश्व हे संकेतस्थळ म्हणजे मराठी ब्लॉग्जची डिरेक्टरीच आहे.

एखादा ब्लॉग मराठी भाषेत आहे आणि तो इतरांनीही वाचावा असा आहे. अशा वेळी ही माहिती इतरांपर्यंत जाणार कशी? यावर उपाय आहे मराठी ब्लॉग विश्व. ब्लॉग हा 'मराठी ब्लॉग विश्व' या संकेतस्थळाशी जोडला गेलेला असावा. मराठी ब्लॉग विश्वशी एकदा ब्लॉग जोडला गेला की त्या ब्लॉगवरची पोस्ट प्रसिद्ध झाल्यावर काही क्षणांतच मराठी ब्लॉग विश्ववर दिसू लागते. त्यामुळे एखाद्या ब्लॉगवरील नवीन लेखनाची माहिती इतरांना मिळत राहाते.

***मराठी ब्लॉग विश्व या संकेतस्थळाशी आज २ हजार २ शे दोन ब्लॉग्ज जोडलेले आहेत.* (✻३)**

मराठी ब्लॉग विश्व हे संकेतस्थळ एक प्रकारे मराठी ब्लाग्जचा आरसाच आहे. कारण २ हजार इतक्या मोठ्या संख्येने मराठी ब्लॉग्जना एकत्रित करणारी ही व्यवस्था आहे. अन्यथा एक-एक करत मराठी ब्लॉग्ज शोधणे आणि आणि त्याचा अभ्यास करणे हे काम जिकीरीचे ठरले असते. दुसरी गोष्ट म्हणजे साधारणपणे मनुष्य ब्लॉग लिहितो ते आपले विचार आणि आपल्याकडे असलेली माहिती इतरांपर्यंत पोचविण्यासाठी. मराठी ब्लॉग विश्वचे सदस्य बनल्यामुळे आपली प्रत्येक पोस्ट मराठी ब्लॉगविश्ववर झळकते आणि एकाच वेळी २ हजार सदस्य असलेल्या वाचकांपर्यंत जाण्याचा मार्ग मोकळा होतो. शिवाय मराठी ब्लॉग विश्वचे सदस्य नसलेले, परंतु वाचक असलेल्यांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे ब्लॉग विषयाची जाण असणारा ब्लॉगर सहसा मराठी ब्लॉग विश्वचा सदस्य असतोच. म्हणूनच प्रस्तुत संशोधक मराठी ब्लॉग्जचा अभ्यास करण्यासाठी मराठी ब्लॉग विश्ववर प्रसिद्ध होणाऱ्या लेखन सामग्रीचा अभ्यास करणार आहे.

१ मार्च २०११ ते १५ मार्च २०११ या कालावधीत मराठी ब्लॉग विश्व या संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेले ब्लॉग्जचे १०० पोस्ट्स अभ्यासासाठी निवडले आहेत.

# १/३ पूर्वसुरींचा अभ्यास

मुळात ब्लॉग हा विषयच अगदी अलीकडच्या काळातला आहे आणि त्यात मराठी ब्लॉग्ज सुरू होऊन अद्याप एक दशकही पूर्ण झालेलं नाही. मराठी ब्लॉग्जची आता कुठं माध्यमांनी दखल घ्यायला सुरुवात केलीय. मराठी ब्लॉग्जवर प्रकाशित होणाऱ्या गोष्टींची दखल घ्यायची असते, असे वातावरणच नसल्यामुळे, मराठी ब्लॉग्जमध्ये असलेल्या अंगभूत शक्तीचा अंदाज न आल्यामुळे असेल कदाचित, पण आजवर मराठी ब्लॉग्जचा संशोधनाच्या अंगानी अभ्यास झाल्याची नोंद आढळत नाही.

हे इंटरनेटचे युग आहे. त्यातही ब्लॉग हे माध्यम इंटरनेटवर अवलंबलेली आहे. त्यामुळे मराठी ब्लॉग्जचा याआधी संशोधनाच्या अंगाने अभ्यास झाला होता अथवा नाही याचा सर्च इंजिनच्या माध्यमातून शोध घेणे सुलभ आहे. प्रस्तुत संशोधकाने तसा शोध घेतला, परंतु या आधी मराठी ब्लॉग हा विषय घेऊन संशोधन झाल्याचे आढळले नाही. ब्लॉगविषयी अभ्यासपूर्ण लेख मात्र लोकसत्तासारख्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत आहेत. २७ फेब्रुवारी २०११ रोजीच्या 'लोकरंग'मधील माधव शिरवाळकरांच्या लेखाचा येथे उल्लेख करता येईल. ब्लॉगविषयक विविध पैलूंचा अभ्यास या लेखांतून मांडण्यात आला आहे.

चित्रपट, ध्वनिप्रसारण, छायाचित्रे आणि त्याला तात्काळ परस्परसंपर्काच्या (इंटरॅक्टिव्हिटी) क्षमतेची जोड या वैशिष्ट्यांमुळे ब्लॉग हे माध्यम ज्ञानप्रसाराच्या क्षमतेत पारंपरिक ज्ञानकोशाला मागे टाकू शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अगदी सामान्यातल्या समान्य माणसाच्या आवाक्यातले हे माध्यम आहे, असे निरीक्षण माधव शिरवाळकर यांनी नोंदविले आहे.

'आय' या इंडियन एक्सप्रेसच्या रविवार विशेषांकात 'द न्यू किडस् ऑन द ब्लॉग' या मथळ्याखाली कव्हर स्टोरी आहे. ब्लॉग या विषयाच्या विविध पैलूंचा यात वेध घेतला आहे. ब्लॉग लिहिणे हे सोम्या-गोम्याचे काम नाही. सशक्त आणि स्मार्ट ब्लॉगच टिकून राहू शकतात, असा सूर या अभ्यासातून लावण्यात आला आहे.

मराठी ब्लॉग बनवावा कसा? मराठीतून ब्लॉग बनविताना येणाऱ्या अडचणी कोणत्या किंवा ब्लॉग्जवरील आपल्या लेखांचे कॉपिराईट कशा रीतीने करावे, ब्लॉग्जवरील लेखांची विषयानुसार वर्गवारी कशी करावी आदी विविध विषयांची माहिती विविध संकेतस्थळं आणि ब्लॉग्जवर उपलब्ध आहे. मात्र एकूणच मराठी ब्लॉग्जच्या संबंधीचा मराठीतून संशोधनाच्या अंगाने अभ्यास झाल्याचे आढळत नाही.

अमेरिकेत अलीकडेच करण्यात आलेल्या इंटरनेट प्रोजेक्ट सर्वेमधून ब्लॉगिंग विषयीची काही नवीन माहिती उजेडात आली आहे. ३० वर्षाखालील तरुण आणि मुलांचे ब्लॉगिंग करण्याचे प्रमाण आश्चर्यकारकरीत्या घटले आहे, तर ३०च्या पुढील प्रौढांमध्ये मात्र ब्लॉगिंगचे प्रमाण काहीसे वाढले आहे. २००६ साली करण्यात आलेल्या संशोधनानुसार १२ ते १७ वयोगटातील मुलांमध्ये आणि १८ ते २९ वयोगटातील तरुणांमध्ये ब्लॉगिंगचे प्रमाण २८ टक्के होते. मात्र २००९च्या संशोधनानुसार मुलांचे ब्लॉगिंगचे प्रमाण १४ टक्के आणि तरुणांचे १५ टक्क्यांवर आले आहे. याच कालावधीमध्ये ३० वर्षांवरील प्रौढांचे ब्लॉगिंगचे प्रमाण ७ टक्क्यांवरून ११ टक्के असे वाढले आहे. **(*४)**

या आकडेवारीतून अमेरिकेच्या ब्लॉगविषयीची वास्तवता समोर येते. परंतु भारतातील ब्लॉगजगताचे विश्लेषण अमेरिकेसारखे असणार नाही, असे मत सेंटर फॉर इंटरनेट अँड सोसायटी, बंगळूरुचे संचालक-संशोधक निशांत शहा व्यक्त करतात. २००३ सालापेक्षा १० पटीने २००४ साली ब्लॉग्जच्या संख्येत वाढ झाल्याचे ब्लॉग्जसाठीच्या इंटरनेट सर्च इंजिन टेक्नोराटीवरून कळते. वर्डप्रेससारख्या ब्लॉगविषयक संस्था देशानुक्रमे ब्लॉगर्सची आकडेवारी जाहीर करीत नाहीत. ब्लॉगवरील जाहिरातींच्या प्रमाणात खूपच संथ गतीने वाढ नोंदवली गेली आहे. अन्य देशांमध्ये ब्लॉगच्या संशोधनाला गती मिळत असल्याचे दिसते.

# १/४ संदर्भ सूची


✻१ http://en.wikipedia.org/wiki/Blog

✻२ दै. लोकसत्ता, पुणे आवृत्ती
दि. २७ फेब्रुवारी, २०११
लोकरंग पुरवणी,
'मराठी ब्लॉग एक रांगतं माध्यम' हा माधव शिरवळकर यांचा लेख.

✻३ http://marathiblogs.net

✻४ eye, The Sunday Express Magazine
February, 6-12, 2011.

# प्रकरण २

## २/१ प्रस्तावना

संशोधन हा शब्द तसा आपल्याला परिचित असा आहे. संशोधन म्हणजे एखादी बाब शोधण्याची प्रक्रिया असे ढोबळ मानाने आपल्याला सांगता येईल. संशोधन ही एक प्रक्रिया आहे. संशोधनाचे मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून संशोधन हे एक शास्त्र म्हणून विकसित झाल्याचे दिसते. मानवी जीवनात अनेकदा समस्या किंवा अडचणी येतात. त्या अडचणी दूर करण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील अभ्यासक किंवा तज्ज्ञ मंडळी संशोधन करतात. काही मंडळी जात्याच चिकित्सक स्वभावाच्या असतात. जिज्ञासू वृत्तीतूनही संशोधन झाल्याचे पाहायला मिळते. संशोधन करताना संशोधनाची उद्दिष्टे, गृहहितकृत्य ठरविले गेले तर संशोधन करण्याला एक दिशा मिळते. उद्दिष्टे आणि गृहितकृत्य काढण्यासाठीही योग्य अभ्यास आवश्यक असतो, अन्यथा दिशाभूल होण्याचीच अधिक शक्यता असते.

योग्य संशोधन होण्यासाठी विषयानुरूप संशोधन पद्धती निवडली जाते. 'मराठी ब्लॉग्ज : एक अभ्यास' या विषयावरील संशोधन प्रबंध सादर करण्यासाठी या प्रकरणात संशोधन म्हणजे काय, संशोधनाच्या पद्धती, संशोधन आराखडा, संशोधनाची उद्दिष्टे, गृहित कृत्ये, तथ्यसंकलन, आशय विश्लेषण या संकल्पनांची चर्चा केली आहे.

# २ / २ संशोधन म्हणजे काय?

संशोधन म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी विविध व्याख्या येथे मांडल्या आहेत. 'वेबस्टर्स इंटरनॅशनल डिक्शनरी'नुसार संशोधन म्हणजे तथ्ये वा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण; किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परिश्रम. **(*१)**

संशोधनाच्या शब्दकोशातील अर्थावरून तथ्यांचा शोध घेण्याशी या शब्दाचा संबंध आहे एवढे समजते. परंतु  हा शोध कशा रीतीने घेतला जातो, का घेतला जातो याची माहिती मात्र मिळत नाही. संशोधन का आणि कसे हे समजून घेण्यासाठी पुढील व्याख्या उपयुक्त आहे.

नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्ष व सिद्धांताचे पुन:परीक्षण करण्याच्या हेतूने चिकित्सक व सखोल चौकशी वा प्रयोग म्हणजेच संशोधन असे म्हणता येईल. **(*२)**

स्लेसिंजर व स्टिफेनसन यांनी सामाजिक शास्त्रांच्या विश्वकोशात संशोधनाची व्याख्या करताना संशोधन प्रक्रियेचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू कोणते याचे स्पष्टीकरण  केले आहे. त्यांच्या व्याख्येप्रमाणे १. सामान्यीकरणाच्या हेतूने संकल्पना व प्रतीके यांची सहेतूक हाताळणी करणे, २. प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढविणे, ज्ञानात सुधारणा करणे, ज्ञान प्रमाणित करणे व ३. प्रमाणित ज्ञानाचा सिद्धांत निर्मितीसाठी व व्यवहारात उपयोग करणे ही संशोधनाची वैशिष्ट्ये आहेत. **(*३)**

## सामाजिक संशोधनाची व्याख्या

यंग, पॉलिन अनुसार व्यावहारिक वा सैद्धांतिकदृष्ट्या उपयुक्त ठरु शकेल असे समाजजीवनाबाबतचे ज्ञान विस्तारण्यासाठी, त्यात सुधारणा करण्यासाठी व ते पडताळून पाहण्यासाठी केले जाणारे समाजजीवनाचे अध्ययन, विश्लेषण व संकल्पनीकरण म्हणजेच सामाजिक संशोधन होय. **(*४)**

ब्लॉग हे समाजजीवनात नव्यानेच आलेले व समाजजीवनावर प्रभाव टाकणारे संवादाचे माध्यम आहे. मराठी भाषिकांमध्ये हळूहळू बस्तान मांडत असलेल्या मराठी ब्लॉग्जविषयी या लघुशोधनिबंधात विविध अंगांनी अभ्यास करण्यात येणार आहे.

# २ /३ संशोधनाची उद्दिष्टे

मराठी ब्लॉग्ज या विषयावर संशोधन करण्यामागे प्रामुख्याने पुढील उद्दिष्टे आहेत.

१. मराठी ब्लॉगर्स ब्लॉगवरून कोणते विचार मांडतात?

२. मराठी ब्लॉग्ज कोणत्या विषयावर किती भर देतात?

३. मराठी जनांना ब्लॉग वाचनाची आवड कितपत आहे?

४. मराठी ब्लॉग वाचक ब्लॉग वाचून प्रतिसाद नोंदवतात का?

५. पुढील काळात मराठी ब्लॉगिंगच्या क्षेत्रात काय घडू शकतं याचा अंदाज घेणे?

६. मराठी ब्लॉगिंग करणाऱ्यांचे वयोगटानुसार प्रमाण काय?

७. कोणत्या प्रकारचे ब्लॉग हे लोकप्रिय आहेत?

८. मराठी माणसं ब्लॉगशी कितपत जोडली आहेत?

# २ /४ गृहित कृत्ये

बेसिस अँड स्ट्रक्चर ऑफ नॉलेज या ग्रंथात बर्कमीस्टर डब्ल्यू. एच. यांनी गृहित कृत्याची व्याख्या मांडली आहे. 'एकदा आपला प्रश्न किंवा समस्या काय हे संशोधनकर्त्याने चांगल्या प्रकारे ओळखले की त्या प्रश्नाची वा समस्येची संभाव्य उत्तरे काय असू शकतील याचा तर्क किंवा अंदाज संशोधनकर्त्यास बांधता येतो. असे तर्क वा अंदाज म्हणजेच गृहित कृत्ये होत. ही गृहित कृत्ये एकतर संशोधनकर्त्यासमोरील समस्या सोडवितात किंवा समस्या निराकरणासाठी हाती घ्याव्या लागणाऱ्या चौकशीत संशोधनकर्त्याचे मार्गदर्शन करतात.'

**(*५)**

वेब्स्टरच्या शब्दकोशाच्या १९५६ च्या आवृत्तीत गृहित कृत्य या संज्ञेचा जो अर्थ देण्यात आला आहे त्यावरून गृहितकृत्यांचे स्वरूप स्पष्टपणे लक्षात येते. या शब्दकोशातील अर्थाप्रमाणे गृहित कृत्य एखादे गृहित धरलेले विधान, तत्त्व किंवा एखादी गृहित धरलेली अट होय. असे विधान वा तत्त्व त्याचे तार्किक परिणाम काय होऊ शकतील याचा अंदाज घेण्यासाठी गृहित धरले जाते व या पद्धतीने ते विधान वा तत्त्व ज्ञात तथ्यांशी किंवा माहीत करून घेता येणाऱ्या तथ्यांशी कितपत सुसंगत आहे याचा पडताळा घेतला जातो. **(*६)**

गृहित कृत्याच्या उपयुक्ततेबाबत कोहेन व नॅगेल म्हणतात की, चौकशी व संशोधनास चालना देणाऱ्या प्रारंभिक अडचणीचे वा समस्येचे संभाव्य निराकरण वा उत्तर सूचविल्याखेरीज आपण संशोधनकार्यात पहिले पाऊलदेखील उचलू शकत नाही. समस्येची अशी संभाव्य उत्तरे आम्हास अध्ययन विषयाच्याच कोणत्यातरी पैलूमुळे किंवा अध्ययन विषयाबाबतच्या पूर्वज्ञानामुळे सूचतात. अशा उत्तरांचे जेव्हा विधानांमध्ये रूपांतर केले जाते तेव्हा ती उत्तरे गृहितकृत्ये बनतात.

सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, १. संशोधनकर्त्यापुढील प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी जी तथ्ये संकलित करणे आवश्यक आहे, त्या तथ्यांचे संकलन व २. परिणामकारक विश्लेषणासाठी त्या तथ्यांचे संघटन कशाप्रकारे व्हावे, ते दर्शविण्यात गृहित कृत्ये मार्गदर्शक ठरतात. **(*७)**

'मराठी ब्लॉग' या विषयावर संशोधन करीत असताना गृहित धरलेली विधाने पुढीलप्रमाणे

आहेत...

१. मराठी ब्लॉगर्स हे प्रामुख्याने १५ ते ३० (युवा) वयोगटातील आहेत.

२. वर्तमान घडामोडींवर भाष्य करणारे ब्लॉग हे अधिक प्रमाणात आहेत.

३. केवळ ब्लॉगमुळेच लेखक बनलेले अनेक ब्लॉगर्स आहेत.

४. ब्लॉग वाचक प्रतिसाद देण्याच्या बाबतीत वृत्तपत्रांच्या वाचकांपेक्षा अधिक सक्रिय आहे.

५. बहुतांश महाविद्यालयीन तरुण हे 'ब्लॉग' या संकल्पनेबद्दल अनभिज्ञ आहेत.

६. यापुढील काळात ब्लॉगचे महत्त्व वाढत जाणार आहे.

# २ /५ संशोधन पद्धती

संशोधनाच्या दृष्टिकोनानुसार अनेक संशोधन पद्धती आहेत. 'मराठी ब्लॉग्ज : एक अध्ययन' या लघुशोध निबंधासाठी वर्णनात्मक पद्धती आणि आशय विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

खास करून महाविद्यालयीन तरुणाई ही आर्कुट, फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंगचा मोठ्या प्रमाणात वापर करताना दिसून येते, परंतु ही तरुणाई ब्लॉग विश्वाशी कितपत जोडली आहे? महाविद्यालयीन तरुण हे किती प्रमाणात ब्लॉग लेखन करतात? स्वत: ब्लॉग लेखन करीत नाही, परंतु आपल्या आवडीच्या ब्लॉग्जचे अनुयायी आहेत असे किती प्रमाण आहे? ब्लॉग या संकल्पनेशी परिचयच नाही अशा तरुणांचे प्रमाण काय आहे इत्यादी माहिती महाविद्यालयीन तरुणांच्या सर्वेक्षणातून मिळणार आहे. प्रश्नावलीच्या आधारे ही माहिती संकलित केली जाणार आहे.

निश्चित केलेल्या कालावधीत मराठी 'ब्लॉग विश्व'वर प्रसिद्ध झालेल्या १०० पोस्टस्‌चा अभ्यास करून या पोस्टस्‌च्या ब्लॉगर्सचा वयोगट काय? प्रामुख्याने संबंधित ब्लॉगर कोणत्या विषयावर लिखाण करतो? पोस्टवर वाचकांच्या प्रतिक्रिया किती आल्या आहेत? साधारण किती दिवसांच्या फरकाने लेखन करतो? वाचकसंख्या किती आहे? ब्लॉगरचे शिक्षण काय आणि विद्यार्थी नसल्यास उपजीविकेसाठी तो सध्या काय करतो? ब्लॉग लिहिण्यापूर्वी कधी नियतकालिकांसाठी किंवा अन्य लेखन केले होते का? या गोष्टींची माहिती संकलित करण्यात येणार आहे. साधारणपणे ही माहिती ब्लॉगवर उपलब्ध असते. एक प्रकारे ही प्रश्नावलीच आहे, परंतु ब्लॉगर्स हे जगातील विविध भागांत पसरलेले असल्याने प्रत्यक्ष भेटून प्रश्नांची उत्तरे घेण्याऐवजी ब्लॉगवरून किंवा ई-मेलवरून ही माहिती मिळविण्यात येणार आहे.

निरीक्षणाच्या कक्षेबाहेरील माहिती प्राप्त करून घेण्यासाठी सामान्य प्रश्नावली, मुलाखती व तंत्राचा वापर करण्यात येतो. प्रश्नावली ही वाक्याप्रमाणेच प्रश्नांची एक पूर्वनियोजित क्रमाने मांडण्यात आलेली यादी असते. अध्ययनकर्ता ही प्रश्नसूची उत्तरदात्यास देतो व त्यातील प्रश्न त्यांना समजावून देऊन स्वत:च्या उपस्थितीत तो उत्तरदात्याकडून या प्रश्नांची उत्तरे भरवून घेतो आणि त्याआधारे निष्कर्ष काढतो.

मराठी ब्लॉग्जच्या संदर्भातील मते जाणून घेण्यासाठी संरचित प्रश्नावली वापरण्यात येणार आहे. संरचित प्रश्नावलीचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये समाविष्ट केलेल्या प्रश्नांचे स्वरूप हे सुस्पष्ट व निश्चित असते.

# २ /६ आशय विश्लेषण

वूलीझर आणि वुईनर यांनी आशय विश्लेषणाची व्याख्या केली आहे. ते म्हणतात, नोंद केलेल्या माहितीचे परीक्षण करण्यासाठी उपयोगात आणलेली पद्धत म्हणजे आशय विश्लेषण.

निश्चित केलेल्या कालावधीत मराठी ब्लॉग विश्ववर प्रसिद्ध झालेल्या १०० पोस्ट्सचा अभ्यास आशय विश्लेषणासाठी करण्यात येणार आहे.

१. वर्तमान घडामोडी
२. प्रेमकविता
३. ललित
४. प्रवासवर्णन
५. स्वत:विषयी (अनुभवकथन)
६. कथा
७. विज्ञानविषयक
८. ऐतिहासिक
९. राजकीय
१०. सामाजिक
११. देश-विदेश
१२. संरक्षण
१३. अध्यात्म
१४. माहितीप्रद
१५. पर्यावरण
१६. वैद्यकीय
१७. साहित्य

वरील विषयांच्या अनुषंगाने प्रत्येक ब्लॉगची वर्गवारी करून आशय विश्लेषण करण्यात येणार आहे. यामुळे कोणत्या विषयावर किती प्रमाणात मराठीतून ब्लॉगवर लिखाण प्रसिद्ध होते, याचा वेध घेता येणार आहे.

# २/७ संशोधन आराखडा

ई. ए. शूमन यांनी संशोधन आराखड्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ‘संशोधन आराखडा म्हणजे संशोधनकार्य ज्याच्या अनुरोधाने थोडेही विचलित न होता एका सरळ रेषेत चालावयास हवे असा विशिष्ट काटेकोर मार्ग नव्हे तर संशोधनकर्त्याने आपल्या कार्यात योग्य दिशेने अग्रेसर होत रहावे म्हणून त्याच्या मार्गदर्शनासाठी उभारलेले मार्गदर्शक संकेत आहेत.’ **(*८)१७१**

संशोधनकर्त्याद्वारा घेण्यात येणाऱ्या व विशिष्ट क्रमाने मांडल्या जाणाऱ्या निर्णयांमधूनच संशोधन आराखडा तयार होत असतो.

# २/८ संकल्पना

सामान्य बुद्धीच्या आटोक्यातील वस्तुस्थितीचे वर्णन करणाऱ्या विधानांकरिता स्पष्टीकरणात्मक आकलनासाठी किंवा सूक्ष्म व संवेदनाक्षम तंत्राच्या आधारे केल्या जाणाऱ्या शास्त्रीय निरिक्षणाकरीता जेथे पुढे अमूर्तीकरणाचा थोडा जरी संबंध येतो तिथे संकल्पनेचा उपयोग केला जातो. संकल्पना व संज्ञांच्या आवश्यकतेचे महत्व अध्ययनात वादातीत आहे.

संज्ञा वा संकल्पनांचा उपयोग केला नाहीतर शास्त्रज्ञांचे ज्ञान फक्त इंद्रिय संवेदनेच्या मूर्त पातळीपुरतेच मर्यादित राहील व इंद्रियसंवेदन कक्षेत आलेल्या गोष्टींपुरतेच त्याचे निष्कर्ष सत्य ठरतील. वस्तू वा पदार्थ हाताळीत असताना शास्त्रज्ञ खऱ्या अर्थाने संकल्पनांच हाताळीत असतो. लोखंडी गोळ्यावर प्रयोग करणाऱ्या पदार्थ वैज्ञानिकांचा खऱ्या अर्थाने संबंध वर्तुळ, गती, घनत्व, दाब, अधिक, उणे यासारख्या अमूर्त संकल्पनांशीच असतो.

ब्लॉग या विषयाचा अभ्यास करीत असताना ब्लॉगशी निगडित काही संकल्पनांची ओळख असणे गरजेचे असते. ब्लॉगशी निगडीत वापरल्या जाणाऱ्या काही संकल्पनांबद्दल येथे माहिती देत आहे.

## प्रबंधात उपयोगात आणलेल्या संकल्पना (* १)

### १. ब्लॉग:

पहिल्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे ब्लॉग म्हणजे एक छोटे वैयक्तीक संकेतस्थळ की ज्यावर आपण हव्या त्या नोंदी करू शकतो. इतरांनाही वाचता येऊ शकेल अशी जगाच्या वेशीला टांगलेली अत्याधुनिक नोंदवही म्हणजेच ब्लॉग. ब्लॉग म्हणजे ऑनलाईन नोंदवही की जी इतरांसाठीही खुली असू शकते.

### २. ब्लॉगर:

जो ब्लॉग लिहितो तो ब्लॉगर. अर्थात ब्लॉगलेखक. ब्लॉगलेखक विशिष्ट सांकेतिक शब्द किंवा पासवर्ड देऊन ब्लॉगचे संपादन, लेखन करू शकतो.

**३. पोस्टः**

ब्लॉगवर एका वेळी ब्लॉगर जी माहिती प्रसिद्ध करतो ती माहिती म्हणजे पोस्ट. समजा ब्लॉगरने क्ष विषयावरील लेख प्रसिद्ध केला तर तो लेख म्हणजे एक पोस्ट.

**४. प्रोफाईलः**

ब्लॉगवर ब्लॉगरची वैयक्तिक माहिती दिलेली असते, तिला प्रोफाईल म्हटले जाते.

**५. कॉमेंटस्ः**

एखादी पोस्ट (लेख, मजकूर) वाचून वाचक आपला अभिप्राय त्या लेखाच्या ठिकाणी नोंदवला तर ती झाली कॉमेंट.

**६. युनीकोडः**

मराठीतून ब्लॉगलेखन करण्यासाठी सर्रासपणे जो फाँटप्रकार वापरला जातो, त्यास युनीकोड फाँट म्हणतात.

**७. लेबलः**

ब्लॉगवर विषयानुसार लेखांची/पोस्ट्सची वर्गवारी केलेली असते. पोस्टला 'लेबल' दिलेला असतो असतो म्हणजे ती पोस्ट कोणत्या विषयाची याचा उल्लेख असतो. यावरून विषयानुरुप माहिती शोधणे सुलभ होते.

# २/९ संदर्भ सूची

डॉ. पु. ल. भांडारकर यांच्या सामाजिक संशोधन पद्धती या ग्रंथातून...
प्रकाशक : महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८१.

* १) तत्रैव पान क्रमांक १४
* २) तत्रैव पान क्रमांक १४
* ३) तत्रैव पान क्रमांक १५
* ४) तत्रैव पान क्रमांक २४
* ५) तत्रैव पान क्रमांक १२१
* ६) तत्रैव पान क्रमांक १२०
* ७) तत्रैव पान क्रमांक १२०
* ८) तत्रैव पान क्रमांक १७१
* ९) **www.blogger.com**

# प्रकरण ३

## ३ /१ ब्लॉगचा इतिहास

ब्लॉग या संकल्पनेचा इतिहास या प्रकरणात पहाणार आहोत. वेब लॉग ही शब्दावली सर्वप्रथम जोर्न बर्गर यांनी १७ डिसेंबर १९९७ रोजी वापरली. वेब लॉग या शब्दाचा संक्षिप्त शब्द म्हणजेच ब्लॉग. ब्लॉग या या शब्दाचे श्रेय मात्र पीटर मेर्होल्झ यांच्याकडे जाते. जे इंटरनेट आणि संकेतस्थळ वापराशी संबंधित आहेत त्यांना वेब लॉग या शब्दावलीचा अर्थ सहज ध्यानात येईल. एखाद्या संकेतस्थळावर स्वत:च्या सदस्यता खात्यात आपला विशिष्ट सांकेतिक शब्द देऊन प्रवेश करणे म्हणजे वेब लॉग करणे अशी साधी व्याख्या करता येईल.

वेब लॉग ("weblog") या शब्दावलीला एक गंमत किंवा विनोद म्हणून पीटर मेर्होल्ज (Peter Merholz) यांनी ब्लॉग ("blog") ही संज्ञा दिली. एप्रिल-मे १९९९ मध्ये Peterme.com या स्वत:च्या ब्लॉगच्या साईड बारमध्ये पीटर यांनी या *weblog* वाक्यप्रचाराचा उपयोग केला. त्यानंतर ईवन विल्यम्स यांनी पायीरा लॅब्स येथे ब्लॉग या संज्ञेचा नाम आणि क्रियापद म्हणून वापर सुरू केला. ("to blog," meaning "to edit one's weblog or to post to one's weblog"). या अनुषंगाने पुढे पायरा लॅब्सने ब्लॉगला प्रसिद्धी दिली. ब्लॉगर हा शब्द पायीरा लॅब्स् ब्लॉगर प्रोडक्टने इतक्या पद्धतशीरपणे विकसित केला की ज्यामुळे हे शब्द चांगलाच लोकप्रिय झाला.

ब्लॉगिंगची संकल्पना लोकप्रिय होण्याआधी डिजिटल कम्युनिटीजमध्ये यूजनेट आणि GEnie सारखे व्यावसायिक ऑनलाईन सेवा वापरात होत्या.

आता प्रचलित असलेली ब्लॉग ही संकल्पना नंतरच्या काळात विकसित होत गेली. संथ गतीने सुरूवात झाल्यानंतरनंतर, ब्लॉगींगला वेगाने लोकप्रियता मिळत गेली. ब्लॉगचा वापर सन १९९९ आणि पुढील वर्षांमध्ये वाढला. त्याचबरोबर आलेल्या प्रथम ब्लॉगसाठीचे अवजारांमुळे ब्लॉग्सची लोकप्रियता शिगेला पोहोचली. आज ऑनलाईन डायरीचे रूप ब्लॉगला आले आहे. वैयक्तिक खाते उघडून ब्लॉग चालविले जात आहेत. बरेचसे ब्लॉग लिहिणारे स्वत:ला डायरिस्टस्, पत्रकार किंवा जर्नलर्सही म्हणवून घेतात. जस्टीन हॉल या विद्यार्थ्याने सर्वप्रथम वैयक्तिक ब्लॉगिंगला सुरुवात केल्याची नोंद आहे.

ब्रूस एबलसन यांनी आक्टोबर १९९८ मध्ये ओपन डायरी स्थापना केली. यापासून प्रेरणा घेऊन आणखी हजारो असल्याच ऑनलाईन डायऱ्या स्थापन झाल्या. ओपन डायरीनी वाचकांसाठी आपले विचार व्यक्त करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. यामुळे ब्रूस एबलसन याने अशा प्रकारची सुविधा देणारा पहिलाच ब्लॉग हा बहुमान मिळवला.

ब्रॅड फित्झ पॅट्रीक यांनी मार्च १९९९ मध्ये लाइव जर्नलची सुरुवात केली. अॅंड्रीव स्मेलस् यांनी जुलै १९९९ मध्ये पितास.कॉम हा ब्लॉग तयार केला. पुढे तो संकेतस्थळावरील न्यूजपेजला एक मोठा पर्याय बनून समोर आला की जो तुलनेनी सांभाळायला सोपा होता. सप्टेंबर १९९९ मध्ये लगेच 'डायरी लॅंड' ची स्थापना झाली. डायरी लॅंडचा रोख फक्त वैयक्तिक डायरी लिहीणाऱ्या समुदायाकडेच होता.

२००२ सालापासून ब्लॉगने नाविन्यपूर्ण आणि खळबळजनक वृत्तकथांमुळे प्रसिद्धी मिळविली. इराक युद्धाप्रसंगी ब्लॉगची भूमिका दखल घेण्याइतपत महत्त्वाची राहिली. ०६ डिसेंबर २००२ रोजी तर इतिहास घडला. जोश मार्शल्स यांनी आपल्या ब्लॉगवर अमेरिकी सांसद लॉटस् यांची सासंद थर्मंड यांच्याविषयीची टिप्पणी प्रसिद्ध केली. परिणामी लॉटस् यांना राजीनामाा द्यावा लागला. यामुळे ब्लॉगचे वाटचालीला एक झळाळी मिळाली. अमेरिकेतील रॅदरगेट स्कॅंडलही ब्लॉगमुळेच उजेडात आलं. यानंतर मात्र ब्लॉग माध्यमाला एक स्वतंत्र माध्यम म्हणून स्थान मिळू लागलं. बातम्यांचा स्रोत आणि राजकीय दबाववाढीसाठीही ब्लॉगचा वापर केला जाऊ लागला.

दरम्यान ईवान विलीअन् आणि मेग हौरीहान यांनी ऑगस्ट १९९९ मध्ये ब्लॉगर.कॉम ची स्थापना केली. हे संकेतस्थळ २००३ मध्ये गुगल कंपनीने खरीदी केले.

मायक्रो ब्लॉगींग हे अजून एक प्रकारचे ब्लॉग आहे ज्यावर संक्षीप्त विचार मांडता येतात. ट्वीटर हा मायक्रोब्लॉगिंग या प्रकारात मोडणारा आहे. डिसेंबर २००७ पर्यंत टेक्नोराती नामक ब्लॉग सर्च इंजीन ११२ दशलक्ष ब्लॉग्स वर नजर ठेवून होते.

# ३ / २ मराठी ब्लॉगचा इतिहास

ब्लॉगर आणि वर्डप्रेस या दोन्हींची सुरुवात २००३ सालातली आहे. अमेरिकेबाहेर इतर भाषांमध्ये ब्लॉगलेखनाचा प्रसार झाला तो प्रामुख्याने २००३ नंतरच. याचाच अर्थ असा की मराठी ब्लॉग्जची सुरुवात होऊन आता कुठं सात-आठ वर्षे होत आहेत.

आज छापील नियकालिकांइतकंच सकस लेखन निव्वळ ब्लॉगसाठी करणारे लोक आहेत! मराठीत 'ब्लॉग' लिहिण्याची- 'मराठी ब्लॉगिंग'ची सुरुवात कधी, कोणी पहिल्यांदा केली हे इंटरनेटवरून तरी माहीत करून घेता येत नाही. तरीदेखील, २५ जून २००४ रोजी बेळगावच्या अजित ओक यांचा 'उगाच उवाच' हा आजही 'मृत' नसलेला ब्लॉग सर्वात जुना ठरतो.

✻(परिशिष्ट पहा)

अजित ओक यांनी दोन स्व-रचित कविताच ब्लॉगवर पुन्हा 'बरहा' नावाच्या टंकात (फॉण्टमध्ये) रीटाइप केल्या आणि झाला ब्लॉग सुरू. अशा हौशी-छंदी ब्लॉगची संख्या हळुहळू वाढत गेली. अनेक कारणांमुळे २००७ पर्यंत मराठीसाठी 'युनिकोड'चा वापर फारच कमी प्रमाणात झाला. त्यामुळे मराठी भाषेत फारच कमी ब्लॉग निर्माण होऊ शकले. २००७ नंतर मात्र झपाट्याने मराठी ब्लॉग तयार होऊ लागले.

२००९- १० या काळात मराठी पत्रकारांचे ब्लॉगही संख्येनं आणि (आधीच छाप्यात प्रसिद्ध झालेल्या) कंटेंटनं फुगले.

जिथं नोकरी करतो त्या प्रकाशनापेक्षा निराळा वाचकवर्ग पत्रकारांना ब्लॉगमुळे मिळाला, पण ही नवनिर्मिती ब्लॉगसाठी नव्हती. ब्लॉग- गर्दी वर्षागणिक वाढत असताना, आपण इथं कशासाठी आहोत, असा रास्त प्रश्न आपापला ब्लॉग सुरू करताना अनेकांना पडू लागल्यावर उत्तरादाखल 'हा ब्लॉग कशासाठी?' अशी प्रस्तावना किंवा हेतुवाक्यं आपापल्या ब्लॉगना देणं सुरू झालं. या प्रस्तावना कशा बदलत गेल्या, हे पाहिल्यास ब्लॉग-स्फिअर कसा बदलत गेला, हेही कळतं.

*''मराठी साहित्य हा माझ्या अतिशय आवडीचा विषय. तसे म्हटले तर प्रत्येकात एक लेखक दडलेला असतो. पूर्वी फार कमी जणांना आपले विचार अभिव्यक्त करायची संधी मिळायची. सुदैवाने इंटरनेटने जवळपास प्रत्येकाला ही संधी ब्लॉग्जद्वारे उपलब्ध करून दिली आहे. मराठी फॉन्ट्समुळे तर आता आपण मातृभाषेत सुद्धा संवाद साधू शकतो. या ब्लॉगला कितपत प्रतिसाद लाभेल हे मला माहीत नाही, पण अल्प का होईना, आपल्या मातृभाषेतून आपल्या जिव्हाळ्याच्या*

*विषयावर संवाद साधता येणे हेहि नसे थोडके''* ही 'प्रस्तावना' (हेच पोस्टचं शीर्षक) http://marathisahitya.blogspot.com या ब्लॉगवर २९ जुलै २००५ रोजी नंदन होडावडेकर यांनी लिहिली आहे. त्यावेळी ब्लॉगचं अप्रूप होतं. ब्लॉगविषयी पाश्चात्य देशांमध्ये आकर्षण निर्माण झाल्याच्या बातम्याही होत्या. त्यामुळे त्यांना ब्लॉग हेच 'सुदैव' वाटण्याचा काळ अवघ्या पाच वर्षांपूर्वी होता.

त्यानंतर सव्वा वर्षानं दुसऱ्या 'अनुदिनी अनुतापे' या ब्लॉगला नंदन यांनी लिहिलेलं 'प्रयोजन' (११ नोव्हेंबर २००६ ) मात्र आटोपशीर आहे. 'मराठी साहित्य या पहिल्या अनुदिनी (ब्लॉग)वर लिहिताना विषयाचे बंधन पाळावे लागत असल्याने, दुसरी- कसलाच धरबंध नसलेली, कुठलाही विषय वर्ज नसणारी अनुदिनी (ब्लॉग) सुरू करण्याचा विचार बरेच दिवस डोक्यात रेंगाळत होता. तो आता प्रत्यक्षात आला एवढंच.''

त्याहीनंतर वर्षभरानं (११ डिसेंबर २००७ ) रोहन जगताप 'अनुदिनी' http://www.anudini.in नावाचा ब्लॉग सुरू करताना लिहितो -'' मराठी ब्लॉगविश्व या साइटला भेट दिल्यावर मला समजलं की, एवढ्या मोठ्या लोकसंख्येतून केवळ सुमारे ३५० लोक 'मराठीतून' ब्लॉग लिहीत आहेत. त्यातही काही 'मृत' आहेत, म्हणजे ३६५ दिवसांहून अधिक काळ लेखन न झालेले ब्लॉग''! हा रोहन जगताप, २०१० च्या मार्चपासून डिसेंबपर्यंत 'अनुदिनी'वर फिरकला नव्हता. अखेर गेल्याच १३ डिसेंबरला त्यानं 'नवी सुरुवात' करताना लिहिलं- ''२००७ च्या डिसेंबर महिन्यात मला ब्लॉगिंगबाबत काही विशेष माहिती नव्हती. पण अनलिमिटेड इंटरनेट आणि हटकणारं कोणीच नसल्यानं दिवसभर अनेक तास मी सर्फिंग करून इंटरनेटबाबत शिकत गेलो. अगदी त्याच काळात मी बराह शिकलो, मराठी ब्लॉग काढले आणि ॲडसेन्सचे अकाउंट काढले, ॲनॅलिटिक्सबाबत शिकत गेलो इ. इ. मला वाटते आता लोक मला या ब्लॉगऐवजी '2know.in साठीच अधिक ओळखत असतील.'' असं होतच राहतं. एका ब्लॉगमुळे दुसऱ्याकडे दुर्लक्ष होणारच.

निवृत्तीनंतर 'फुलटाइम ब्लॉगर' झालेले चंद्रशेखर आठवले यांनी 'चायनाडेस्क' नावाचा एक निराळाच ब्लॉग http://achandrashekhar.blogspot.com फुलवला, तरीही अन्य दोन ब्लॉगकडे त्यांचं लक्ष राहिलं. निव्वळ ब्लॉगलेखक या कारकीर्दीतून एक इंग्रजी व दोन मराठी पुस्तके (ईबुक) त्यांनी केली. 'चायनाडेस्क' ही मराठीत नवी माहिती आणण्याची चांगली

सुरुवात आहे. 'हा ब्लॉग कशासाठी' याचे हेतुवाक्य चंद्रशेखर यांनी लिहिले आहे:

दक्षिण पूर्व आशियामधल्या माझ्या वास्तव्यानंतर, चीन या देशाचे जागतिक महत्त्व माझ्या लक्षात आले. चिनी लोकांची राहणी, त्यांचा इतिहास, भूगोल, त्यांची दु:खे आपल्याला माहितीच नाहीत. चीनच्या अंतरंगात डोकावण्याचा हा एक अगदी प्राथमिक प्रयत्न आहे.

आज अनेक मराठी पत्रकारांचे स्वत:चे ब्लॉग्ज आहेत. पण इंग्रजीत ज्या नियमितपणाने ब्लॉग्ज चालतात, तेवढा नियमितपणा आणि सातत्य मराठीत दिसत नाही. त्याचं एक कारण अजून ब्लॉग या प्रकाराला मराठीत जे ग्लॅमर प्राप्त व्हायला हवं, तेवढं मिळालेलं नाही. आपल्या हातातला मोबाइल फोन आपण आज गांभीर्यानं घेतला आहे, कारण आपल्याला त्याचा उपयोग नीट कळला आहे. आपल्या हातातला किंवा लेखणीतला ब्लॉग आपल्याला त्या दृष्टीने अजून नीट कळायचा आहे. ही बाब ब्लॉग्जना (अगदी पत्रकारांच्या गंभीर ब्लॉग्जनाही) ज्या प्रकारच्या सवंग कॉमेंटस् येतात, ते पाहिलं की ते जाणवतं.

ब्लॉग सजवणं, तो रंगबिरंगी, हलता-डुलता करणं हे आज फार सोपं झालं आहे. शाळेत मुलाच्या हातात सुशोभित पाटी किंवा वही द्यावी, अशा ब्लॉगच्या देखण्या टेम्पलेटस् शेकडय़ाच्या संख्येने समोर हात जोडून मोफत डाऊनलोडसाठी उभ्या आहेत. लहान-लहान मुले त्यांचा उपयोग करताना दिसतात.

मराठी ब्लॉग्जचे अभ्यासक आजवरच्या मराठी ब्लॉगच्या वाटचालीबद्दल लिहितीत की *प्रश्न ब्लॉग कसा दिसतो हा नाहीच, तर त्यात काय आहे, हा आहे. सगळीकडे 'कंटेंट विल बी दि किंग' असं म्हटलं जातं. मराठी ब्लॉग आज चाकोरीबाहेरच्या कंटेटसाठी आसुसलाय. चाकोरीबाहेरचे ब्लॉग आले की, ते वाचण्यासाठी वाचक हजारोंच्या संख्येने या महाराष्ट्रातल्या जिल्ह्या-जिल्ह्यांत वाट पाहत आहेत. जोडीला वादळी प्रचारासाठी फेसबुक आणि ट्विटरसारखी अवजारे आहेत. लक्षात हे घ्यायला हवं की, फेसबुक हे कॉलेजच्या कॅन्टिनसारखे, तर ब्लॉगोस्फिअर हे सभागृहात उत्साहानं चाललेल्या चर्चासत्रासारखं आहे. दोन्हींची आपली दालनं वेगळी आहेत. ती एकमेकांना उपकारक ठरत राहतील आणि आपापलं वेगळंपणही जपत राहतील.**४

एकूणच काय तर मराठी ब्लाग्जची वाट्चाल समाधानकारक असली तरीही आणखी वावही खूप आहे. गेल्या २-३ वर्षांत ब्लॉग विषयावरील लेख हळूहळू मुद्रित माध्यमांतून दिसू लागले आहेत. मराठी वृत्तपत्रांपैकी लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स या दैनिकांनी ब्लॉगचा वेध घेणारे माहितीप्रद लेख प्रकाशित केले आहेत. दै. प्रहारने मराठी ब्लॉग विषयावर यंदापासून एक नवं सदरच सुरू केलं आहे.

# ३/३ संदर्भ सूची

'ब्लॉगचा इतिहास' या प्रकरणासाठी पुढील संकेतस्थळ आणि लेखांचा आधार घेतला आहे.


१. http://en.wikipedia.org/wiki/Blog

२. माधव शिरवळकर यांचा 'मराठी ब्लॉग : एक रांगतं माध्यम' हा लेख.
दै. लोकसत्ता, लोकरंग, २७ फेब्रुवारी २०११, पान ९.

३. समीक्षा नेटके यांचा लेख
दै. प्रहार इंटरनेट आवृत्ती, २ जानेवारी २०११.

४. 'आय' हा ब्लॉग विषयावरील विशेषांक
इंडियन एक्सप्रेस, ६ फेब्रुवारी २०११

# प्रकरण ४

# महाविद्यालयीन तरुणांच्या सर्वेक्षणाचे विश्लेषण

## ४/१ प्रस्तावना

महाविद्यालयीन तरुणाला ब्लॉग म्हणजे काय, हे माहित आहे काय? ते ब्लॉग वाचतात का? आणि ब्लॉग वाचणारे तरुण कोणत्या विषयावरील ब्लॉग वाचण्यास प्राधान्य देतात? ब्लॉग वाचल्यानंतर तिथे प्रतिक्रिया नोंदविणाऱ्या तरुणांचे प्रमाण काय आहे, महाविद्यालयीन तरुणांमध्ये स्वत: ब्लॉगिंग करण्याचे प्रमाण किती आहे आणि ब्लॉगिंग करण्यामागची त्याची नेमकी भूमिका काय, या बाबी जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधकाने सोलापूर शहरातील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमेश्वर महाविद्यालय, जवाहरलाल नेहरु वसतीगृह या ठिकाणी जाऊन १०० विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेतली. १०० विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेतल्यानंतर त्या माहितीच्या आधारे पुढील निष्कर्ष काढले आहेत.

सोलापूर शहरातील महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी साधारणपणे निम्म्याहून अधिक विद्यार्थी हे ग्रामीण भागातून आलेले आहेत. सर्वसाधारण कुटुंबातून आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अर्थातच अधिक आहे. शैक्षणिक माहिती मिळविण्यासाठी बरेच विद्यार्थी इंटरनेट सुविधेचा वापर करतात. एमएससीआयटीसारखे अभ्यासक्रम करणारेही विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आहेत. ई-मेल आणि फेसबुक, आरकुटसारख्या सोशल नेटवर्किंगसाठी बहुतेक तरुणाई इंटरनेटचा वापर करते. परंतु ब्लॉग लेखन आणि वाचन करण्यासाठी मनातली इंटरनेटसंबंधीची भीती किंवा अज्ञान दूर होण्याची गरज आहे. त्यामुळे ब्लॉग संकल्पना वृत्तपत्रांतील बातम्यांच्या माध्यमातून ऐकून माहित असलेले विद्यार्थी मोठ्या संख्येने असले तरी ब्लॉगशी मैत्री झालेली नसणे स्वाभाविक म्हटले पाहिजे. तरीही सोलापूरसारख्या ग्रामीण स्पर्श असणाऱ्या शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थी आणि ब्लॉगशी त्यांचा येणार संबंध १०० विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेऊन प्रातिनिधिक अभ्यास या ठिकाणी केला आहे. या अभ्यासातून आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे...

# ४/२ निष्कर्ष

१. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरुणांपैकी ६८ टक्के तरुणांना ब्लॉग कशाला म्हणतात याची माहिती आहे तर ३२ टक्के तरुणांना ब्लॉग हे काय असते याची माहिती नाही. याचाच अर्थ असा की सुमारे ३२ टक्के तरुण हे चालू घडामोडी, वृत्तपत्रे, टी.व्ही. बातम्या याकडे गांभीर्याने पाहात नाहीत. ६८ टक्के विद्यार्थ्यांना ब्लॉग कशाला म्हणतात याची ढोबळ माहिती आहे. प्रस्तुत संशोधकाने महाविद्यालयीन तरुणाईशी सर्वेक्षणाच्या निमित्ताने संवाद साधला तेव्हा काही विद्यार्थी संगणकनिरक्षर असल्याचे समजले. अभियांत्रिकीचे शिक्षण घेणारा विद्यार्थी संगणक आणि इंटरनेटशी अनभिज्ञ असू शकतो, ही धक्कादायक बाब आहे.

३२ टक्के विद्यार्थी ब्लॉग या संकल्पनेबद्दल अनभिज्ञ आहेत. ई मेल, वेबसाईट या संकल्पना ऐकून तरी साधारणपणे विद्यार्थ्यांना माहितीच्या असतात. मात्र ब्लॉग म्हणजे नेमके काय याची माहिती ३२ टक्के महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना नाही.



२. ब्लॉगची माहिती आहे असे सांगणाऱ्या ६८ टक्के महाविद्यालयीन तरुणांपैकी आम्ही कधीमधी ब्लॉग वाचत असतो असे सांगणारे ७६ टक्के विद्यार्थी भेटले तर ब्लॉग माहिती आहे मात्र आम्ही कधी ते वाचत नाही असे २४ टक्के विद्यार्थ्यांनी सांगितले.




ब्लॉग वाचणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ७६ टक्के आहे. परंतु यातील बहुतेक विद्यार्थी खूप कमी वेळा ब्लॉग वाचतात. प्रश्नावली भरून घेताना प्रस्तुत संशोधकाने साधलेल्या अनौपचारिक संभाषणातून ध्यानात येते की फेसबुक, आरकूट यासारख्या सोशल नेटवर्किंगवर महाविद्यालयीन युवा अधिक रेंगाळते. ब्लॉग वाचण्याचे नेमके कारण मात्र हे विद्यार्थी देत नाहीत. आपला कोणी परिचित, मित्र ब्लॉगर असेल आणि त्याने मैत्रीच्या नात्याने ब्लॉग वाचायला सांगितले तर ब्लॉग वाचतो असे काहींनी सांगितले.

मात्र २४ टक्के विद्यार्थी ब्लॉगची माहिती असूनही कधी ब्लॉग वाचत नसल्याचे सांगतात.

३. ब्लॉग वाचकांचा विषयवार प्राधान्यक्रम खालील आलेखात दर्शिविला आहे.




ब्लॉग वाचणाऱ्यांपैकी किती टक्के तरुण कोणत्या विषयांवरील ब्लॉग वाचतात हे सोबतच्या आलेखावरून स्पष्ट होते. चालू घडोमोडीवरील ब्लॉग वाचणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे ६७ टक्के आहे. याचा अर्थ टाईमपास किंवा उथळ गोष्टींसाठी नव्हे तर स्वत:ला चालू घडामोडींची माहिती आणि दृष्टी मिळावी यासाठी वाचन करणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे आणि ही एक विशेष उल्लेखनीय बाब ठरते.

चालू घडामोडीमध्ये क्रीडा, राजकीय, शेजारील देशांशी संबंध, चित्रपट आदी अनेक विषय येतात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांचे एक आकर्षण आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये प्रामुख्याने सामान्य ज्ञान आणि चालू घडामोडीला महत्त्व असते. त्यामुळे अधिकांश महाविद्यालयीन तरुण वर्तमान घडामोडी जाणून घेण्याचा प्रयत्न करीत असावेत, असे म्हणता येईल. किंवा चालू घडामोडी जाणून घेण्याकडे असलेला विद्यार्थ्यांचा कल पाहता विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षाविषयी आकर्षण निर्माण झाले आहे, असेही म्हणता येईल. विविध महाविद्यालयांतील ग्रंथालयात स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी आणि शिवछत्रपती रंगभवनजवळील विद्यापीठ अभ्यासकेंद्र येथे स्पर्धा परीक्षांची कसून तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात दिसतात. ब्लॉग वाचणाऱ्यांपैकी ६७ टक्के विद्यार्थी चालू घडामोडी वाचनाला प्राधान्य देतात. यावरून असे म्हणता येईल की सोलापूरातील तरुणाई स्पर्धा परीक्षांबद्दल सजग झाली आहे.

चालू घडामोडीच्या नंतर वैचारिक विषयांवरील ब्लॉग वाचायला विद्यार्थ्यांनी पसंदी दिली असून हे प्रमाण ३४ टक्के इतके आहे. वैचारिक वाचन करण्याचे प्रमाण समाधानकारक आहे. सोशल नेटवर्किंगचा धांडोळा घेता जाणवते की विद्रोही, हिंदुत्व आणि एखाद्या घटनेचे तटस्थ विश्लेषण या विषयावरील ब्लॉगच्या वाचनाकडे तरुणाईचा कल आहे. राजकीय आणि सामाजिक घडामोडींचे विश्लेषण विविध विचारधारांच्या आधारे किंवा तटस्थपणे करणारे अनेक ब्लॉगही लोकप्रिय आहेत. विचारांचे खंडन-मंडनही सुरू असते. विचारधारा जुळलेले ब्लॉगर्स वर्ष-सहा महिन्यातून एकदा ठरवून पुणे-मुंबईसारख्या ठिकाणी एकत्र आल्याचीही उदाहरणे आहेत. या पार्श्वभूमीवर ब्लॉग वाचकांपैकी ३४ टक्के विद्यार्थी वैचारिक वाचन करते ही बाब सामाजिक अभिसरणाच्या दृष्टीने सकारात्मक आहे.

राजकीय घडामोडींविषयीचे लेख वाचणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे १९ टक्के आहे. राजकीय विषयांबाबत महाविद्यालयीन तरुण उदासीन असल्याचे बोलले जाते मात्र वस्तुस्थिती तशी नाही. राजकीय विषयाखालोखाल ब्लॉगवाचक प्रेमविषयक कविता, लेख आणि साहित्य किंवा वाङमयीन विषयांवरील ब्लॉग वाचण्याला प्राधान्य देतात असे दिसून आले आहे.

४. ब्लॉगवर प्रतिक्रिया नोंदविण्याचे प्रमाण




वृत्तपत्र वाचकांची संख्या पाहिली तर तुलनेने २ टक्क्यांपेक्षा कमी वाचक आपल्या प्रतिक्रिया वृत्तपत्रांकडे नोंदवितात. मात्र ब्लॉग वाचकांपैकी ३८ टक्के वाचक हे ब्लॉगविषयी आपल्या प्रतिक्रिया नोंदवितात असे म्हटले आहे. ब्लॉगवर तात्काळ प्रतिक्रिया नोंदविण्याची सोय असते. ब्लॉगवर प्रतिक्रिया नोंदविण्यासाठी वेगळे कष्ट करावे लागत नाही. वाचताक्षणी मनात आलेले विचार तिथे मांडता येतात व ते इतरांसाठीही वाचायला उपलब्ध असतात. वृत्तपत्रांकडे प्रतिक्रिया नोंदविण्यासाठी मात्र पत्र आणणे, लिहिणे आणि पोस्ट करणे ही प्रक्रिया किंवा ई -मेल करणे ही प्रक्रिया पूर्ण करावी लागते. मात्र ब्लॉगवर प्रतिक्रिया नोंदविणे सुलभ आहे. त्याचाच परिणाम म्हणजे ३८ टक्के ब्लॉगवाचक विद्यार्थ्यांनी ते प्रतिक्रिया नोंदवितात असे सांगितले आहे.

संवाद हा दोन्ही बाजूने असणे सामाजिक अभिसरणाच्या दृष्टीने आवश्यक असते आणि ही क्रिया मुद्रित आणि दूरदर्शन माध्यमांपेक्षा अधिक प्रभावीपणे ब्लॉगच्या माध्यमातून साध्य होते, हेच या आकडेवारीतून दिसून येते.

५. ब्लॉग वाचणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असली तरी त्यातील सुमारे ९० टक्के वाचकांना आपल्याला आवडणाऱ्या ब्लॉगचे नाव सांगता आले नाही. ८-१० टक्के विद्यार्थ्यांनी मात्र आपल्या आवडीच्या ब्लॉग्सची नावे सांगितली. छोटा डॉन, भारत मराठी, साहित्यिक मंच, अंतर्नाद मनाचे, माईंड, पी. सिद्धाराम, क्रिस्टीन कार्निगन ही काही ब्लॉगची नावे प्रश्नावलीतून समोर आली आहेत की जी आपल्या आवडीची आहेत असे वाचकांनी म्हटले आहे.

बऱ्याचदा फेसबुक, ऑरकूट या सोशल नेटवर्किंगच्या वॉलवर किंवा स्क्रॅप्समध्ये ब्लॉगवरील लेख वाचण्यासाठी आवाहन करून लिंक दिलेली असते. कधीकधी बल्क ई मेल्स पाठवूनही ब्लॉग वाचण्याचे आवाहन करण्यात येते. तेव्हा संबंधित ब्लॉग वाचला जातो आणि नंतर विसरलाही जातो. त्यामुळे ब्लॉगवाचकांना ठराविक ब्लॉगचे नाव सांगणे कठीण जात असावे असे वाटते. असे असले तरी ठराविक व्यक्तीचे ब्लॉग आवडते म्हणून नियमीत वाचतो असे म्हणणारेही काही वाचक आहेत. मात्र हे प्रमाण कमी आहे.

वास्तविक पहाता ब्लॉगवर सदस्यता करून घेण्यासाठीची सुविधा ठेवता येते. परंतु ती सुविधा अनेक ब्लॉगर वापरत नाहीत असे दिसते. तसेच फॉलोवरर्सची सुविधा असते. परंतु फॉलोवर बनल्यामुळे त्या ब्लॉगवर पोस्ट केले जाणारे लेख आपोआप फॉलोअरला पोचत नाहीत. परंतु याची माहिती बऱ्याच जणांना नसल्यामुळे एखाद्या आवडीच्या ब्लॉगजे अपडेट्स आपोआप मिळविण्यासाठीची सुविधा वापरण्यात येत नाही. परिणामी एखादा ब्लॉग आवडला तरी तो कालांतराने विस्मरणात जातो. ब्लॉग वाचकांना आवडीच्या ब्लॉग्जची नावे सहजपणे सांगता आली नाही, यामागे हे कारण असावे. त्यामुळे ब्लॉगर्सनी ब्लॉग पृष्ठाच्या दर्शनी भागात नियमित अपडेटसाठी नोंदणीची सुविधा उपलब्ध केल्यास ब्लॉगर्सना आपला एक हक्काचा वाचक वर्ग तयार करणे शक्य आहे.

६. ब्लॉग वाचणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी २९ टक्के विद्यार्थी स्वत: ब्लॉगिंग करतात तर स्वत:चे ब्लॉग नसणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ७१ टक्के आहे.




सर्वसाधारणपणे सर्वच जण लेखन करतात असे होत नाही. परंतु काही वैयक्तिक अनुभव, प्रवास वर्णन, एखाद्या सामाजिक, राजकीय विषयावरील आपले मत जाहीररीत्या व्यक्त करण्यासाठी ब्लॉग हे माध्यम आहे. असे लेखन तर सर्वच जण करू शकतात. ब्लॉग तयार करणे म्हणजे खूप कठीण काम आहे, असा समज सर्वसाधारणपणे आहे. केवळ अज्ञानामुळे हा समज आहे. परिणामी ७१ टक्के ब्लॉगवाचकांचा स्वत:चा ब्लॉग नाही. २९ टक्के ब्लॉग वाचकांचा स्वत:चा ब्लॉग आहे. मात्र त्यातील बहुतांश ब्लॉग हे मृत अथवा निष्क्रिय आवस्थेत आहेत. कधीतरी ब्लॉग तयार केला आणि नंतर काही पाहिलेच नाही, असं सांगणाऱ्याची संख्या मोठी आहे. आपापले ब्लॉग तयार करून फेसबुक, ट्वीटरवर त्याची लिंक फडकविल्यास वाचकसंख्या वाढेल असे वाटते.

महाविद्यालयांनी, समाजसेवी संस्थांनी ब्लॉग तयार करण्याच्या तासाभराच्या कार्यशाळा ठिकठिकाणी आयोजित केल्यास त्यास प्रतिसादही चांगला मिळेल आणि ब्लॉग माध्यमाविषयीची उदासीनता दूर होईल.

७. ब्लॉग लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ४६ टक्के ब्लॉगर्स हे त्यांच्या ब्लॉगला वाचकांचा चांगला प्रतिसाद आहे असे म्हणतात तर १४ टक्के ब्लॉगर्स हे मिळणाऱ्या प्रतिसादाबद्दल असमाधानी आहेत. ब्लॉग लिहिणाऱ्यांपैकी ४० टक्के विद्यार्थी हे मिळणाऱ्या प्रतिसादाबद्दल समाधानी आहेत ही बाब विशेष नोंद घेण्यासारखी आहे. बऱ्याच ब्लॉगर्सचे ब्लॉग हे खूपच वैयक्ति असतात. ब्लॉगवाचकांना आकर्षुन घेण्यात ते कमी पडतात. त्यामुळे ते ब्लॉग दुर्लक्षित रहातात.

४० टक्के ब्लॉगर्स हे ब्लॉगला कसा प्रतिसाद मिळतो हे सांगू शकत नाहीत याचाच अर्थ ही मंडळी नियमीत ब्लॉगिंग करणारी नसणार असे वाटते. ब्लॉगरच निष्क्रिय असेल तर वाचक प्रतिसाद कसा देणार?



# प्रकरण ५

# आशय विश्लेषण

## ५/१ प्रस्तावना

'मराठी ब्लॉग विश्व'वर १ मार्च ते १५ मार्च २०११ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या सलग १०० पोस्टस्वर आधारित आशय विश्लेषण येथे मांडण्यात येत आहे. प्रस्तुत संशोधकाने सलग १०० पोस्टस् म्हणजे १०० ब्लॉगज्वरील १०० पोस्टस्चे वाचन केले. ढोबळ मानाने त्या त्या ब्लॉगवरील इतर पोस्टस्चा, प्रोफाईलचा अदमास घेण्याचा प्रयत्न केला. याशिवाय मराठी ब्लॉग विश्ववर साऱ्या ब्लॉगर्सना संशोधनासाठी (परिशिष्टात जोडल्याप्रमाणे) प्रश्नावली भरून पाठविण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे जे ब्लॉग लेखक ब्लॉगकडे गांभीर्याने पाहतात, ज्यांनी आपला ब्लॉग अतिशय प्रभावी रीत्या सजवला आहे, ज्यांचे ब्लॉग लोकप्रिय आहेत, ज्यांच्या ब्लॉग्जना पुरस्कार मिळाले आहेत, अशा १४ ब्लॉगर्सनी प्रश्नावली भरून पाठवली आणि अतिशय आत्मियतेने संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या. ब्लॉगर्सनी पाठविलेली माहिती ही खूपच मौल्यवान दस्तावेज ठरणार आहे. ही माहिती परिशिष्टात जसेच्या तसे सादर केले आहे. या सर्व माहितीच्या आधारे काही निष्कर्ष येथे मांडत आहे.

मराठी ब्लॉग विश्वचे २ हजाराहून अधिक सदस्य आहेत. त्यातील सक्रिय ब्लॉगर्सचे प्रमाणही मोठे आहे. त्यामुळे रोजच्या रोज पोस्ट होणाऱ्या लेख/साहित्याचे प्रमाण प्रचंड आहे. प्रतिनिधीक स्वरूपात १०० पोस्टस्चा अभ्यास करून निष्कर्ष मांडले आहेत.

*आजच्या मराठी ब्लॉग्जमध्ये चाकोरीबाहेरचे विषय हाताळणारे काही लेखक निश्चितच आहेत. केवळ विनोद, कविता, प्रवास वर्णनं, स्वतचे अनुभव व वरवरची मते यांनी भरलेल्या ब्लॉग्जची गर्दी ही सर्वच भाषांत दिसते, तशी मराठीतही आहे, आणि ती राहणारच. ती राहणं हे अंतिमत: उपकारकही आहे. प्रश्न सुमारांच्या गर्दीचा नाही. कारण ब्लॉगोस्फिअरमध्ये लाखो करोडो कोरी पाने उपलब्ध होऊ शकतात. ती कमी पडणार नाहीत. फक्त त्यातून वाचायलाच हवीत, अशी चमकदार पानं तयार व्हायला हवीत. त्या दृष्टीने नाटक सिनेमांचं होतं, तसं ब्लॉग्जचं परीक्षण किंवा त्यांना एक ते पाचच्या श्रेणीत बसवणं अशी व्यवस्था नाही. वृत्तपत्रं सिनेमांना एक ते पाच स्टार्स देऊन परीक्षणं करत असतात. कारण ती पठडी आता पक्की झाली आहे. ब्लॉग्जनाही तसा न्याय लावावा.* ✻

## ५/२ ब्लॉग अभ्यासाचे निष्कर्ष

मराठी ब्लॉग विश्ववरील १ मार्चनंतरच्या सलग १०० पोस्ट्सच्या आधारे केलेले आशय विश्लेषण येथे मांडत आहे.

| | |
|---|---|
| १. वर्तमान घडामोडी | ०४ |
| **२. प्रेमकविता** | **०६** |
| **३. कविता** | **१८** |
| **४. ललित** | **१८** |
| **५. स्वत:विषयी (अनुभवकथन)** | **१२** |
| **६. प्रवासवर्णन** | **०६** |
| **७. कथा** | **०४** |
| ८. ऐतिहासिक | ०२ |
| **९. धार्मिक** | **०६** |
| १०. ज्योतिष | ०२ |
| ११. माहितीप्रद | ०२ |
| १२. आरोग्य | ०२ |
| १३. नाट्य-चित्रपट | ०४ |
| १४. बाल | ०४ |
| १५. आहार | ०२ |
| १६. तरुणाई | ०० |
| १७. क्रिकेट | ०४ |
| १८. चित्रकला | ०४ |

मराठी ब्लॉग विश्ववरील सलग १०० पोस्टस्च्या अभ्यासातून कळते की मराठी ब्लॉग विश्ववर प्रसिद्ध होणाऱ्या पोस्टस्मध्ये सर्वाधिक पोस्टस् या साहित्य विषयक आहेत. ६४ टक्के पोस्टस् या साहित्य विषयावरील आहेत. या प्रामुख्याने प्रेमकविता (६ टक्के), कविता (१८ टक्के), ललित (१८ टक्के), अनुभवकथन (१२ टक्के), प्रवासवर्णन ६ टक्के, कथा (४ टक्के) असे प्रमाण आहे.

मराठी ब्लॉगविश्ववर दर्जेदार, साहित्य मूल्य असलेले अनेक ब्लॉग आहेत. वटवट सत्यवान या नावाचा हेरंब ओक (न्यू जर्सी) यांचा ब्लॉग वाचकाच्या मनाचा वेध घेणारा आहे. मनातली वटवट मनातच राहिलेली बरी नसते, तिला व्यक्त होऊ द्यावं म्हणून ब्लॉगिंग करत असल्याचे हेरंब सागतात. दैनंदिन जीवनात येणाऱ्या कोणत्याही विषयावर अतिशय खुसखुशीत शैलीत भाष्य करणारा हा ब्लॉग साहित्यिक मूल्य असलेला आहे. उपहास, विनोद, ललीत... काय नाही या ब्लॉगमध्ये. हेरंब हा चळवळ्या ब्लॉगर आहे. ब्लॉगवरून होणाऱ्या वाङमयचोरीविरुद्ध दंड थोपटून चोरांना अद्दल घडवतो तसे शिवधर्म, विद्रोही चळवळ आदीतील एकांगीपणा, फोलपणाही आपल्या प्रभावी लेखणीने वाचकांसमोर आणतो. डॉ. भगवान नागपूरकर यांचा जीवनाच्या रगाड्यातून, सिद्धार्थ यांचा माझ्या गजाल्या, कमलेश कुलकर्णी यांचा अफू, नरेंद्र प्रभू, प्रभाकर फडणीस यांचे ब्लॉग साहित्याचे विविध प्रकार हाताळतात. पूनम छत्रे यांनी कथा पौर्णिमा या ब्लॉगवर दर्जेदार कथा लिहिल्या आहेत.

सगळ्याच ब्लॉग्जचा उल्लेख करता येत नसला तरी मराठी साहित्यात भर घालणारे साहित्य ब्लॉग्जवर निर्माण होत आहे, हे मराठी ब्लॉग विश्वचा फेरफटका मारल्यास सहज ध्यानात येऊ शकेल. ब्लॉगर्सचे एक महासंमेलन मुंबईत जून २०११ मध्ये होऊ घातलं आहे. परंतु त्यात पहिल्यांदा नोंदणी करणाऱ्या ७५ जणांनाच प्रवेश आहे. ही सुरुवात आहे. आता यापुढे पुणे, मुंबईच्या बाहेरील शहरांतूनही असे मेळावे होऊ लागतील तेव्हा ब्लॉगवरील वाङमयधनाचे महत्त्व उर्वरीत समाजाच्या ध्यानी येऊ लागेल. ब्लॉग्जवरील साहित्याचा सुगंध दरवळल्याशिवाय राहील कसा. आता अनेक वृत्तपत्रांमध्ये ब्लॉग्जवरील लेखांना वृत्तपत्रांतून स्थान मिळत आहे. ब्लॉग्जवर लेखन करणारे लेखक हे चौफेर दृष्टी असलेले, आधुनिकतेशी नाळ असणारे, समाजात वावर असणारे, प्रवास करणारे, देशोदेशी नोकरी व्यवसायानिमित्ताने भटकंती करणारे आहेत. परिणामी त्यांच्या लेखनाला वास्तवाची जोड आहे. आगामी काळात ब्लॉग साहित्य हा नवा साहित्यप्रकार उदयास आल्यास नवल नाही.

साहित्यविषक ब्लॉग्जनंतर धार्मिक विषयावरील लेखनाचा क्रम लागतो. ६ टक्के पोस्टस् हे धार्मिक विषयावरील असल्याचे आढळून आले आहेत. बहुतांश ब्लॉगर हे उच्चशिक्षित किंवा चांगल्या पदावर नोकरी - व्यवसाय करणारे आहेत. आधुनिक विचारांचे आहेत. परंतु आधुनिक विचाराचे आणि विदेशात राहणारे मराठी ब्लॉगर्स असले तरी त्यांची मराठी संस्कृतीशी असलेली नाळ घट्ट आहे. आपल्या संस्कृती आणि धर्माविषयी सार्थ अभिमान बाळगणारी आहे, हे ब्लॉग्जवरील धार्मिक विषयांवरील पोस्टस्‌मधून जाणवते. सणावारांची पारंपरिक माहिती ब्लॉगवर पहायला मिळते तशी तीर्थक्षेत्रांचीही माहिती आणि तीर्थक्षेत्र भेटींचा अनुभव ब्लॉगवर आहेत. केदार लसणे यांनी महापूजा नावानेच ब्लॉग सुरू केले आहे. तुळजाभवानी महात्म्य यावरुन भक्तीभावाने सांगितले आहे.

वर्तमान घडामोडी, नाट्य-चित्रपट, बाल, क्रिकेट आणि चित्रकला या विषयाशी संबंधित प्रत्येकी ४ टक्के पोस्टस् प्रसिद्ध झाले आहेत. या कालावधीत वल्ड कप क्रिकेट स्पर्धा होत्या, त्यामुळे क्रिकेट विषयावरील प्रकाशित पोस्टचे प्रमाण हे ४ टक्के दिसून आले आहे.

वास्तविक पहाता ब्लॉगवाचकांचा कल हा वर्तमान घडामोडी जाणून घेण्याकडे आहे. परंतु तरीही वर्तमान घडामोडींवर भाष्य करणारे अधिक ब्लॉग उपलब्ध नाहीत. याची दोन कारणे असू शकतील असे प्रस्तुत संशोधकास वाटते. एक- वर्तमान घडामोडींची माहिती देणारे अनेक वृत्तपत्रांची संकेतस्थळ सहज उपलब्ध आहेत. महाराष्ट्र टाईम्स, ई-सकाळ, गूगल न्यूज, रेडिफ न्यूज, समाचार, सिफी आदी वृत्तसंकेतस्थळं अत्यंत चोखपणे चालू घडामोडींचा वेध घेतात. या वृत्तसंकेतस्थळांशी तुलना करता एका व्यक्तीने चालविलेल्या ब्लॉगला निश्चित मर्यादा आहेत. त्यामुळे ब्लॉगर्स चालू घडामोडींविषयी ब्लॉग अधिक प्रमाणात लिहित नसावेत, अशी शक्यता आहे.

दोन - बहुतांश ब्लॉगर्स हे मध्यम वर्गीय आहेत. शिक्षणानंतर नोकरी व्यवसायात गुंतलेले आणि स्वांतसुखाय ब्लॉगिंग करणारे. वैचारिक चळवळी किंवा राजकीय चळवळी या मंडळींचा क्वचीत संबंध आलेला असे. त्यामुळे कदाचित ब्लॉगर्स चालू घडामोडींची दखल घेत लेखन विश्लेषणात्मक लेखन करण्याकडे वळत नसावेत.

वर्तमान घडामोडींवर लिहिणारे कमी आहेत. आणि वर्तमान घडामोडी, वैचारिक, राजकीय विश्लेषण वाचण्यासाठी आसुसलेल्यांची संख्या मोठी आहे. ही गरज मुक्तपीठ सारख्या व्यासपीठामुळे मोठ्या प्रमाणात भागते आहे. असे असले तरी ही गरज पाहता आगामी काळात वर्तमान घडामोडींवर भाष्य करणारे, राजकीय आणि वैचारिक विश्लेषण करणारे ब्लॉग लिहिणारेही मोठ्या संख्येने पुढे येतील, अशी शक्यता वाटते. कारण वाचकांची गरज अधिक दिवस अपूर्ण राहत नसते. गरज निर्माण झाली की पर्यायही निर्माण होतोच.

आहार, ज्योतिष, माहितीप्रद, ऐतिहासिक, आरोग्य या विषयावरील प्रकाशित पोस्टचे प्रमाण २ टक्के आढळले. येथे नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे हे पोस्ट गुणवत्तेच्या अंगाने खूपच सरस ठरणारे आहेत. ज्योतिषासारखा विषयही ब्लॉगवर अत्यंत आकर्षक आणि खुसखशीतरीत्या मांडता येतो हे 'धोंडोपंत उवाच' या वैशिष्ट्यपूर्ण ब्लॉगवरून ध्यानात येते. धोंडोपंत उवाच या नावाने असलेला ब्लॉग भन्नाट आहे. एखादा ज्योतिषी ब्लॉग लिहू शकतो आणि तेही ब्लॉग पहाताक्षणी थक्क व्हावे असे, ही बाबच वाचकाच्या मनात जिज्ञासा निर्माण करते. ब्लॉगवर येताक्षणी वाचक खिळून रहतो. लेखकाची तर्कशुद्ध आणि विषय मांडण्याची तऱ्हा खूपच कल्पक आहे.

आरोग्य आणि आहार हे आजच्या जीवनशैलीत महत्त्वाचे विषय झाले आहेत. चाफा हा ब्लॉग आहाराविषयी वाचकाशी हितगुज करतो. रेसिपी विषयक माहितीही या ब्लॉगवर आहे. सर्वांसाठी आयुर्वेद या ब्लॉगवर वैद्य गोपाळ सावकर आयुर्वेदातील सूत्रं सोप्या आणि सुटसुटीत भाषेत मांडतात. डॉ. सावकर यांनी आयुर्वेद आणि दैनंदिन आरोग्य यांची सांगड घालत सोप्या, सुलभ भाषेत मूल्यवान ज्ञान या ब्लॉगच्या माध्यमातून मांडतात.

तरुणाईशी संबंधित, करियर संबंधित, महिलांच्या समस्या, परराष्ट्र संबंध, संरक्षण विषयक, शिक्षणविषयक या विषयावरील एकही पोस्ट अभ्यासासाठी निवडलेल्या १०० पोस्टस्मध्ये आढळले नाही. एकूणच प्रस्तुत संशोधकाने गेल्या ४ महिन्यात मराठी ब्लॉग विश्वचा जो अभ्यास केला त्यात करियर, महिला, पराराष्ट्र संबंध, संरक्षण या विषयावरील लेखन अपवाद वगळता आढळले नाही. परंतु असे असले तरी ब्लॉग्जवरील प्रवास वर्णन हे खूपच प्रगल्भ असल्याचे आढळून येते. नाट्य आणि चित्रपट सृष्टीशी संबंधित ब्लॉगलेखनही त्या क्षेत्रातील अनुभवी लेखकांकडून लिहिले जाते असे आढळते.

शेती या विषयाला ब्लॉगच्या माध्यमातून अत्यंत प्रभावीपणे मांडता येते हे गंगाधर मुटे यांच्या ब्लॉगवरून कळते. गंगाधर मुटे यांचा शेती विषयावरील इतका लोकप्रिय ब्लॉग एकमेव असण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या भावभावना, शेतकऱ्याचे अनुभवविश्व यांना मानाचे स्थान या ब्लॉगमुळे मिळाले आहे. बी.एससी. गणित झालेले मुटे शेतकरी विहार, बळीराजा, शेतकरी संघटना, मार्ग माझा वेगळा या नावाने ब्लॉग्ज चालवितात. केवळ दीड वर्षांपासून ब्लॉगलेखनाला सुरुवात केलेले मुटे वाचकांच्या उदंड प्रतिसादाने अधिक जोमाने ब्लॉगिंग करताना दिसतात. शेती वाङमय, ललित आणि काव्य या प्रकारात ते लिहितात. ब्लॉगिंगआधी लेखन खूपच तुरळक प्रमाण करीत होतो, मात्र ब्लॉगिंगमुळेच हरतऱ्हेने व्यक्त व्हायची संधी मिळाल्याचे मुटे सांगतात. 'वांगमय शेती ते वाङमय शेती' हे त्यांच्या ब्लॉगचे नावही कल्पक आहे.

शंतनू देव यांच्या 'माणिक मोती' या बालमित्रांसाठीच्या ब्लॉगने आपले एक वेगळे स्थान मराठी ब्लॉग जगतात निर्माण केले आहे. केवळ मुद्रित साहित्यच नाही तर ऑडिओ, व्हिडिओ च्या स्वरूपातही त्यांनी ब्लॉग सजवला आहे.

मधुचंद्रासाठी जाणाऱ्या नवदांपत्त्यांना उपयुक्त ठरणाऱ्या ब्लॉग्जपासून ते ब्लॉकखरेदी करताना कोणती काळजी घ्यावी इथपर्यंत, वात्रटिकांपासून ते प्रेमकवितांपर्यंत, ज्योतिष-धार्मिक विषयांपासून नाट्य-चित्रपटांपर्यंत, आयुर्वेदापासून ते आहार-विहार असे विविध विषय मराठी ब्लॉग्जवर हाताळले जात आहेत.

मराठी ब्लॉग्जचे अभ्यासक माधव शिरवळकर मराठी ब्लॉग्जवरील आशयाबाबत म्हणतात, *'मराठी ब्लॉग आज चाकोरीबाहेरच्या कंटेटसाठी आसुसलाय. चाकोरीबाहेरचे ब्लॉग आले की, ते वाचण्यासाठी वाचक हजारोंच्या संख्येने या महाराष्ट्रातल्या जिल्ह्या-जिल्ह्यांत वाट पाहत आहेत. जोडीला वादळी प्रचारासाठी फेसबुक आणि ट्विटरसारखी अवजारे आहेत. लक्षात हे घ्यायला हवं की, फेसबुक हे कॉलेजच्या कॅन्टिनसारखे, तर ब्लॉगोस्फिअर हे सभागृहात उत्साहानं चाललेल्या चर्चासत्रासारखं आहे. दोन्हींची आपली दालनं वेगळी आहेत. ती एकमेकांना उपकारक ठरत राहतील आणि आपापलं वेगळंपणही जपत राहतील. अमेरिकेत आज ब्लॉगवर लिहून उपजिविका करणारे, पगारापेक्षा अधिक रक्कम त्यातून नियमित मिळवणारे आहेत. ते भाग्य मराठी ब्लॉग लिहिणारांच्या वाट्याला कधी येईल का, या प्रश्नाचं उत्तर अनेक संबंधित घटकांच्या एकत्रित परिणामात लपलेलं आहे. प्रत्येकाच्या हातात क्षणाक्षणाला मोबाइलचा कॅमेरा आहे. त्यात पकडलेल्या छायाचित्राचे किंवा चलत्चित्राचे क्षण तिथल्या तिथे मोबाइलमधूनच ब्लॉगवर प्रकाशित होऊ शकतात. घडल्या क्षणापासून काही सेकंदात ते चित्र जगाला दिसू शकतं. 'सिटीझन जर्नालिझम'चं फार मोठं बीज नजिकच्या काळात मराठी ब्लॉग्जमध्ये रूजू शकतं. 'सिटीझन जर्नालिझम' या शक्तीचा अंदाज आपल्याला अजून यायचा आहे. ब्लॉग हे त्यासाठीचं जबरदस्त व्यासपीठ आहे.'*

## ५/३ ब्लॉगर्स अभ्यासाचे निष्कर्ष

'मराठी ब्लॉग विश्व'वर केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत काही लोकप्रिय ब्लॉगर्सनी प्रश्नावली भरून पाठविली आहे. त्या आधारे काढलेले निष्कर्ष येथे मांडत आहे.

ब्लॉग हा विषय गांभीर्याने घ्यायचा विषय आहे असे ज्यांना वाटते, ब्लॉगची आंतरिक शक्ती ज्यांनी जाणले आहे अशा निवडक लोकांनी पाठवलेल्या माहितीच्या आधारे ब्लॉगर्सचा वयोगट शोधला आहे.

१८ ते ३० वयोगटातील ब्लॉगर्सचे प्रमाण हे ४० टक्के आहे तर ३० ते ६० या वयोगटातील ब्लॉगर्सचे प्रमाण ६० टक्के आहे.



१ जानेवारी २०११ ते ३१ मार्च २०११ या कालावधीत केलेल्या ब्लॉग अभ्यासातून एक बाब निदर्शनास येते की ३० ते ६० या वयोगटातील ब्लॉगर्सचे ब्लॉग लेखन हे अधिक प्रगल्भ आहे. ३० ते ६० या वयोगटातील ब्लॉगर्स हे साधारणपणे करियर-व्यवसायात स्थिर झालेले असतात. अथवा आर्थिकदृष्ट्या स्वत:च्या पायावर उभारलेले असतात. स्वत:कडे लॅपटॉप किंवा संगणक आणि इंटरनेट सुविधा असते. नोकरी व्यवसायातून वेळ काढून आपल्या आवडीनुसार ते लेखन करू शकतात. गाठीशी अनुभवही असतो. म्हणूनच  ३० ते ६० या वयोगटातील ब्लॉगर्सची संख्या अधिक आहे, असा निष्कर्ष काढता येईल.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे तसे नसते. अभ्यासाचा ताण असतो, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसतो, अभ्यास आणि सोशल नेटवर्किंगच्या बाहेर तो सहसा येताना दिसत नाही. त्यामुळे ब्लॉगर्समध्ये त्यांचे प्रमाण तसे कमी आहे. १८ ते २५ या वयोगटातही २३ ते २५ वयोगटातील ब्लॉगर्स अधिक संख्येने आहेत.

अनुभवी ब्लॉगर्सचे ब्लॉगबद्दलचे अभिप्राय परिशिष्टात विस्तृतपणे दिलेले आहेतच. एकूणच अनुभवी ब्लॉगर्सचे अभिप्राय पाहिले तर असा निष्कर्ष निघतो की ब्लॉग माध्यम आगामी काळात आणखी प्रभावी होत जाणार आहे. ब्लॉगचे भवितव्य उज्ज्वल आहे.

येथे काही अनुभवी ब्लॉगर्सनी ब्लॉगच्या भवितव्याबद्दल व्यक्तविले अभिप्राय ब्लॉगच्या भवितव्याचा निष्कर्ष काढताना ध्यानात घ्यावे लागतील.

२६ वर्षीय देवेंद्र अशोक चुरी ब्लॉगच्या भवितव्याबद्दल म्हणतात की, मराठी ब्लॉगिंग आपल्या भाव भावनाना अनुभवांना लोकांसमोर मांडण्याचे एक सुंदर ठिकाण आहे.

'ऐसी अक्षरे मेळविन' या सर्वांगसुंदर ब्लॉगचे ३८ वर्षीय लेखक विशाल विजय कुलकर्णी ब्लॉगिंगच्या भवितव्याबद्दल म्हणतात, इंटरनेट ही नव्या मनुची, नव्या पिढीची भाषा आहे. पेपर मिडीया दिवसें दिवस कमी होत चाललाय. अशा परिस्थीतीत ब्लॉगींग हीच नव्या जगाची भाषा ठरेल.

डबिंग (व्हॉईस ओव्हर)चा व्यवसाय करणाऱ्या ३७ वर्षीय सौ. कांचन फिरदोस कराई यांचे मोगरा फुलला आणि ब्लॉगवाले हे ब्लॉग वाचनीय आहेत. दीर्घकथा, चित्रपट परिक्षण, सामाजिक व राजकीय घडामोडींविषयक लेखन, ब्लॉगिंगविषयक तांत्रिक माहिती त्या ब्लॉगच्या माध्यमातून लिहितात.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संपूर्ण व विनामूल्य लाभ जिथे घेता येतो असे ब्लॉग हे व्यासपिठ आहे. सामान्य व्यक्तीमधील असामान्यत्वाची प्रचिती इथे चटकन येते. वृत्तपत्र किंवा इतर प्रसारमाध्यमांकडून एखाद्या गोष्टीची दखल न घेतली गेल्यास ब्लॉगवर आपले गाऱ्हाणे विस्तृतपणे मांडता येते, इतकेच नव्हे तर लेखक, कवी, चित्रकार, छायाचित्रकार यांना स्वत:च्या साहित्याची व कलेची माहिती देण्यासाठी ब्लॉगिंग हे उत्तम माध्यम ठरले आहे. भविष्यात अधिकाधिक लोक स्वत:ला व्यक्त करण्यासाठी ब्लॉगिंगचा आधार घेणार आहेत यात शंका नाही, असं त्या म्हणतात.

विद्रोही विचारधारेवर प्रेम करणारा प्रकाश लालासाहेब पोळ हा तरुण ब्लॉगच्या माध्यमातून म्हणतो देव-धर्मासारख्या भाकड गोष्टींवर माझा विश्वास नाही. ज्यानी शोषितांच्या लढ्याला बळ दिले ते सर्व महापुरुष माझ्या दृष्टीने देवापेक्षा श्रेष्ठ आहेत. सह्याद्री बाणा हा ब्लॉग म्हणजे आजवर ज्या माणसांनी बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य खर्ची घातले त्या महापुरुषांचा वारसा पुढे न्यायचा छोटासा प्रयत्न. प्रकाशच्या सह्याद्री बाणा या ब्लॉगला पाच महिन्यात २ लाख वाचकांनी भेट दिली.

ब्लॉग हे माध्यम सहज उपलब्ध होणारे व जलदगतीने सर्वांपर्यंत पोहचणारे आहे. ब्लॉगच्या माध्यमातून आपले विचार जसेच्या तसे मांडता येतात, असे प्रकाश म्हणतो.

रानमोगरा, वांगमय शेती ते वांङ्मय शेती या वैशिष्ट्पूर्ण ब्लॉगद्वारे शेतीला सन्मान मिळवून देणारे ४८ वर्षीय गंगाधर महादेवराव मुटे म्हणतात ब्लॉगींगमुळेच हवे त्या तऱ्हेने व्यक्त व्हायची संधी मिळाली. आज ना उद्या सर्वांना ब्लॉगिंगची दखल घ्यावीच लागेल. लोकशाहीचा पाचवा आणि मुख्य आधारस्तंभ म्हणून ब्लॉगिंगला महत्व येण्याची चिन्हे आहेत. जनसामान्यांचे प्रश्न अधिक प्रभावीपणे व्यक्त करण्याचे आणि निरंकुश सत्तेला अंकुश लावण्याइतपत ताकद या ब्लॉगिंगमध्ये आहे, असे त्यांचे ठाम मत आहे. स्टारमाझा टीव्ही ने घेतलेल्या ब्लॉगमाझा स्पर्धेत माझ्या त्यांच्या ब्लॉगला पारितोषक मिळाले आहे.

'काय वाटेल ते' या नावाने ब्लॉगलेखन करणारे ५० वर्षीय महेंद्र कुलकर्णी हे इंजिनियर आहेत. ते म्हणतात, हळू हळू बाळसं धरू लागलंय मराठी ब्लॉग विश्व. मी दोन वर्षापूर्वी ब्लॉग लिहिणे सुरु केले तेंव्हा फक्त ८००ब्लॉग होते, आज ती संख्या २ हजारच्या वर गेली आहे. नविन लेख पोस्ट केल्याच्या दिवशी ब्लॉग वर कमीत कमी हजार तरी लोकं येतात, इतर दिवशी जवळपास ८०० लोक भेट देतात. याचा अर्थ असा की लोकांना वाचायला आवडतं. ब्लॉग वरचे बरेच लेख नियतकालीकात पण प्रसिद्ध झाले आहेत. ब्लॉगिंग मुळे नविन लोकांचे नविन शैलीचे लेखन वाचायला मिळते, आणि हीच खरी ब्लॉगिंगची शक्ती आहे.

३२ वर्षीय अभियंता जयदीप गणेश भोगले हे मराठी कथा, कविता, समीक्षा, मालिकांसाठी लेखन करतात. ब्लॉग हे जसे जसे इंटरनेट व्यापक होत जाईल तसे अधिक व्यापक होईल. गूगल काही दिवसात मराठी व भारतीय भाषांमंध्ये ॲडसेन्स चालू करून एक उत्पन्नाचे साधन निर्माण करेल. आणि तो एक समृद्ध ब्लोग्विश्वसाठी वरदान ठरेल. कदाचित एक नवीन साहित्य आणी ई साहित्यिक या प्रयत्नातून निर्माण होतील. बाकी 'वाढता वाढता भेदिले शून्य मंडळा' अशा मार्मिक शब्दांत ब्लॉगमहिमा सांगतात.

उपरोल्लेखित अभ्यासू आणि अनुभवी ब्लॉगर्सच्या अभिप्रायांवरून ब्लॉगला उज्ज्वल भवितव्य असल्याचा निष्कर्ष निघतो.

# प्रकरण ६
# निष्कर्ष

'मराठी ब्लॉग्ज : एक अभ्यास' या विषयावरील लघुशोधनिबंधातून प्रस्तुत संशोधक पुढील निष्कर्षांपर्यंत आला आहे.

१. मराठी ब्लॉगर्स हे प्रामुख्याने १८ ते ३० या वयोगाटातील आहेत, हे गृहितकृत्य चूक असल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे. याउलट ३१ ते ६० या वयोगटातील ब्लॉगर्सचे प्रमाण हे अधिक असल्याचे आढळून आले आहे. १८ ते ३० वयोगटातील ब्लॉगर्सचे प्रमाण हे ४० टक्के आहे तर३१ ते ६० या वयोगटातील ब्लॉगर्सचे प्रमाण ६० टक्के आहे.

विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे ठरलेल्या कालावधीत प्रस्तुत संशोधकाला १८ वर्षाखालील एकही ब्लॉगर आढळून आला नाही. याचा अर्थ अपवाद वगळता मराठी भाषीक बाल आणि किशोर हे ब्लॉगींग करीत नाहीत, असे स्पष्ट होते.

२. वर्तमान घडामोडींवर भाष्य करणारे ब्लॉग हे अधिक संख्येने आहेत, हे गृहित कृत्यही चूक असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. साहित्य विषयावरील ब्लॉगचे प्रमाण हे ६४ टक्के आढळून आले आहे. साहित्य विषय ललित, कविता, कथा, प्रवासवर्णन, अनुभवकथन, प्रेमकविता आदी प्रकारचे साहित्य विपुल प्रमाणात मराठी ब्लॉग्जवर प्रसिद्ध होताना दिसते. वर्तमान घडामोडींवर केवळ ४ टक्के ब्लॉग्ज असल्याचे प्रस्तुत संशोधनातून समोर आले आहे.

असे असले तरी वाचकांचा अधिक कल हा वर्तमान घडामोडींवरील ब्लॉग्ज वाचण्याकडे असल्याचे स्पष्ट झाले आहे. ब्लॉग वाचकांपैकी ६७ टक्के वाचकांनी वर्तमान घडामोडींविषयी जाणून घेण्यासाठी ब्लॉग वाचत असल्याचे सांगितले आहे तर ३४ टक्के विद्यार्थ्यांनी राजकीय विषय ब्लॉग्जवर वाचायला प्राधान्य देतात असे सांगितले आहे. म्हणजे वर्तमान घडामोडी आणि राजकारण या विषयावरील ब्लॉग्जची संख्या कमी असली तरी ब्लॉग वाचक मात्र वर्तमान घडामोडी आणि राजकारण या विषयांवरील ब्लॉग्ज वाचण्याला अधिक प्राधान्य देतो.

३. केवळ ब्लॉगमुळेच लेखक बनलेले अनेक ब्लॉगर्स आहेत, हे गृहित कृत्य सत्य सिद्ध झाले आहे. विद्यार्थी जीवनात परीक्षा लिहित होतो आणि त्यानंतर ब्लॉगवर लिहायला सुरूवात केली असे असे सांगणारे अनेक मराठी ब्लॉगर्स आहेत. ब्लॉगवर लिहिण्याआधी वर्तमानपत्रांतून थोडेफार लिखाण करणारे, मात्र ब्लॉगमुळे अधिक लिखाण करू लागले असे अनेक ब्लॉगर्स आहेत. ब्लॉगवर प्रकाशित साहित्य पुस्तकरुपाने प्रकाशित केलेलेही ब्लॉगर्स आहेत. एकूणच काय तर ब्लॉगमुळे न लिहिणारे लिहिते झाले. लिहिणारे अधिक लिहू लागले. ब्लॉगमुळे अनेक जण लिखाणाच्या बाबतीत 'बसलेले चालू लागले आणि चालणारे पळू लागले' असे म्हणता येईल.

४. ब्लॉग वाचक हा प्रतिसाद देण्याच्या बाबतीत वृत्तपत्रांच्या वाचकांपेक्षा अधिक सक्रिय आहे, हे गृहित कृत्य संशोधनातून सिद्ध झाले आहे. वृत्तपत्र वाचून प्रतिसाद नोंदविणाऱ्या वाचकांची संख्या १-२ टक्के असते मात्र ब्लॉग वाचून प्रतिक्रिया देणाऱ्या वाचकांची संख्या ३८ टक्के असल्याचे पुढे आले आहे.

५. बहुतांश महाविद्यालयीन तरुण हे ब्लॉग या संकल्पनेबद्दल अनभिज्ञ आहेत, हे गृहितकृत्य संशोधनातून चूक सिद्ध झाले आहे. ६८ टक्के तरुणांना ब्लॉग ही संकल्पना माहित आहे, असे आढळून आले आहे. केवळ ३२ टक्के तरुण हे ब्लॉगबद्दल अनभिज्ञ आहेत. ब्लॉग माहित असणाऱ्या तरुणांची संख्या अधिक आहे.

६. यापुढील काळात ब्लॉगचे महत्त्व वाढत जाणार आहे, हे गृहितकृत्यही संशोधन अभ्यासातून सत्य सिद्ध झाले आहे. माध्यमांचा अभ्यास असणारे, ब्लॉग विषयातील तज्ञ आणि ब्लॉगर्स या सगळ्यांनीच ब्लॉगचे महत्त्व आगामी काळात आणखी वाढेल असा अंदाज वर्तवला आहे. ✻(परिशिष्ट्ये पहा). ब्लॉगर्सची दरवर्षी वाढत जाणारी संख्या आणि ब्लॉग वापराची सुलभ पद्धत पाहता, ब्लॉगचे महत्त्व वाढत जाणार या गृहितकृत्याला पुष्टीच मिळते.

७. मराठी ब्लॉगर्स हे ब्लॉगवरून साधारणपणे कविता, स्वत:चे अनुभव, ललित लेखन, प्रवास वर्णन मांडण्याला प्राधान्य देतात असे दिसते. साहित्यातील हे विषय स्वत:भोवती फिरणारे आहेत. ब्लॉग म्हणजे ऑनलाईन डायरी, असाच ब्लॉगचा प्रचार असल्यामुळे स्वत:ची अभिव्यक्ती करण्याकडे ब्लॉगर्सचा अधिक कल दिसतो. मात्र याच वेळी काही ब्लॉगर्स इतरांना उपयुक्त माहिती पोचावी या तळमळीने उपयुक्त माहिती ब्लॉगवरून देण्याचा प्रयत्न करतात. मात्र अशा ब्लॉग्जची संख्या मर्यादित आहे. आपण कार्यरत असलेल्या क्षेत्राचा वेध घेणारी, माहितीप्रद आणि त्या क्षेत्रातील स्वत:च्या सहभागाची माहिती देणाऱ्या ब्लॉगर्सनी परिश्रमपूर्वक ब्लॉगची वाचनीयता टिकवून ठेवल्याचे आढळते.

८. मराठी जनांत ब्लॉग वाचनाची आवड आता कुठे निर्माण होऊ लागलीय. तरुण वर्ग नियमीत ब्लॉग वाचत नसला तरी अधून मधून ब्लॉग वाचतो असे म्हणणाऱ्यांची संख्या वाढताना दिसत आहे. आपल्याला आवडलेल्या पोस्टस्वर वाचक आवर्जून प्रतिक्रिया नोंदवताना दिसतात.

९. विषय कोणताही असला तरी तो किती प्रभावीरीत्या मांडला आहे यावर ब्लॉगची लोकप्रियता ठरते, असे दिसून आले आहे. गंगाधर मुटे यांचा शेतीला प्राधान्य देणारा ब्लॉग, शंतनु देव यांचा बाल विषयांना प्राधान्य देणारा ब्लॉगही लोकप्रिय आहे. ब्लॉग कोणत्या विषयावर आहे, यापेक्षा विचारांची खोली, कल्पकता, सर्जनशीलता असणारे ब्लॉग मराठी वाचक वाचतात असे दिसते.

# शिफारसी

मराठी ब्लॉग्ज या विषयाचा अभ्यास करताना प्रस्तुत संशोधकाला संबंधित विषयाच्या अनेक पैलुंची माहिती झाली. शेकडो मराठी ब्लॉग्जचा धावता अभ्यास झाला. अनेक ब्लॉगर्सशी संवाद झाला. तरुणांचा ब्लॉगविषयीचा कल समजून घेता आला. या अभ्यासावर आधारित काही शिफारसी प्रस्तुत संशोधक येथे करीत आहे. सामाजिक विकासात ब्लॉगचा एक प्रभावी माध्यम म्हणून उपयोग होऊ शकणार आहे. त्या अनुषंगाने या शिफारसी आहेत.

१. आपल्या समाजामध्ये ब्लॉगविषयी अद्याप पूर्ण जागरुकता आलेली नाही. ब्लॉगची तोंडओळख करून देणाऱ्या कार्यशाळांचे आयोजन सामाजिक संस्था, महाविद्यालये यांनी केल्यास ब्लॉग हे प्रबोधनाचे एक सशक्त माध्यम बनू शकते.

२. लेखन कौशल्य आणि विश्लेषणाची सुप्त क्षमता असणारे विद्यार्थी समाजात विखुरलेल्या अवस्थेत असतात. त्यांच्या सुप्त क्षमतांना फुंकर घालून, त्यांना ब्लॉगची ओळख करून देण्यासाठी प्रशिक्षण मेळावे आयोजित केल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक झळाळी मिळू शकते.

३. व्याख्याते, लेखक, कवी, विचारवंत यांचा जनसंपर्क दांडगा असतो, मात्र त्याला भौगोलिक मर्यादा पडलेली असते. या मंडळींना ब्लॉग्ज वापरण्यासाठी प्रवृत्त केले किंवा ब्लॉगशी जोडले तर भौगोलिक मर्यादा पार करून मोठ्या प्रमाणात त्यांचे विचार समाजासमोर येऊ शकतात.

४. हजारो ब्लॉग्जमधून सर्वसामान्यांना उपयुक्त आणि वाचनीय असे ब्लॉग्ज शोधणे कठीण असते. तेव्हा वृत्तपत्रांच्या माध्यमातून पुस्तक परिचय प्रकाशित होतात, तसे चांगल्या ब्लॉगचा परिचय करून देणारे लेख, सदर येत राहिल्यास वृत्तपत्रांचे वाचक आपल्या आवडीच्या विषयातील ब्लॉगशी जोडले जाऊ शकतात.

५. प्रत्येक ब्लॉगवर त्या ब्लॉगचे सदस्य होण्यासाठी सुविधा दर्शनी भागात असावी, जेणेकरून एखादा ब्लॉग वाचकाला आवडला की तो त्या ब्लॉगचा सदस्य होईल आणि जेणेकरून त्याला नियमीत त्या ब्लॉगवरील नवीन पोस्टस्‌ची माहिती मिळत राहील.

६. ब्लॉगर्सनी आपल्या परिचयपत्रात फोन, मोबाईल, ई मेल प्रमाणे ब्लॉगचाही उल्लेख करावा. याने ब्लॉगचा प्रसार होण्यास मदत होईल.

# प्रकरण ७ : परिशिष्ट्ये

## परिशिष्ट्य : १

*सर्वात जुना उपलब्ध मराठी ब्लॉग*



# परिशिष्ट्य : २

*गंगाधर मुटे यांचा 'शेती 'विषयावरील वैशिष्ट्यपूर्ण ब्लॉग*



## परिशिष्ट्य : ३

*मराठी ब्लॉग विश्वचे मुख्य पृष्ठ किंवा होम पेज*



# परिशिष्ट्य : ४

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग

सर्वेक्षण

## विषय : मराठी ब्लॉग्ज - एक अभ्यास

**अभ्यासक : सिद्धाराम भै. पाटील** **मार्गदर्शक : डॉ. रवींद्र चिंचोलकर**

**नाव :** ____________________

**महाविद्यालय :** ____________________

**प्रश्नावली**

१. ब्लॉग म्हणजे काय, हे तुम्हाला माहित आहे का?
   अ) होय आ) नाही

२. तुम्ही ब्लॉग वाचत असता का?
   अ) होय आ) नाही

३. तुम्ही कोणत्या विषयावरील ब्लॉग वाचण्यास प्राधान्य देता?
   अ) प्रेमविषयक आ) साहित्य इ) राजकारण ई) वैचारिक उ) चालू घडामोडी ऊ)................

४. ब्लॉग वाचल्यानंतर तिथे प्रतिक्रिया नोंदविता का?
   अ) होय आ) नाही

५. तुमच्या आवडीच्या ब्लॉगचे नाव सांगा. ____________________

६. तुम्ही ब्लॉगिंग करता का?
   अ) होय आ) नाही

७. ब्लॉगिंग करण्यामागची नेमकी भूमिका सांगा.
   अ) करमणूकीसाठी आ) माहिती मिळविण्यासाठी इ) अपडेट ठेवण्यासाठी

८. तुमच्या ब्लॉगला वाचकांचा प्रतिसाद कसा मिळतो?

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग

सर्वेक्षण

## विषय : मराठी ब्लॉग्ज - एक अभ्यास

**अभ्यासक : सिद्धाराम भै. पाटील** **मार्गदर्शक : डॉ. रवींद्र चिंचोलकर**

**नाव :** ______________________________

**वय :**

**शिक्षण/व्यवसाय:** ______________________________

**प्रश्नावली**

१. तुमच्या ब्लॉगचे नाव सांगा.

______________________________

२. कोणत्या विषयावर ब्लॉगिंग करता?

______________________________

३. वाचकांचा प्रतिसाद कसा वाटतो?
अ) समाधानकारक आ) बरा इ) असमाधानकारक ई) माहित नाही.

४. ब्लॉगिंगला सुरुवात करण्याआधी लेखन करीत होता का?
अ) होय आ) नाही

५. किती वर्षांपासूक ब्लॉगिंग करीत आहात?

______________________________

६. ब्लॉगिंगच्या भवितव्याबद्दल आपले मत सांगा.

______________________________

# परिशिष्ट्य : ५

**'मराठी ब्लॉग विश्व'वरील अभ्यासू ब्लॉगर्सची माहिती**

## १. देवेंद्र अशोक चुरी

ब्लॉगचे नाव : दवबिंदू

वय: २६

शिक्षण-व्यवसाय : नोकरी

कोणत्या विषयावर ब्लॉग लिहिता?.कशावरही

वाचकांचा प्रतिसाद - समधानकारक

ब्लॉगिंगआधी लेखन करीत होता का? अ) होय

किती वर्षांपासूक ब्लॉगिंग? २वर्षे

ब्लॉगिंगच्या  भवितव्या बद्दल मत

मराठी ब्लॉगिंग आता हळूहळू चांगला वेग घेत आहे. आपल्याला अजून खूप पुढे न्यायच आहे मराठी ब्लॉगिंगला आपल्या भाव भावनाना अनुभवांना लोकांसमोर मांडण्याच एक सुंदर ठिकाण आहे.

http://davbindu.wordpress.com

## २. महेंद्र गंगाराम सावंत

ब्लॉगचे नाव

http://mahesh-fortswari.blogspot.com/2011/02/blog-post.html एका रानवेड्याची शोधयात्रा

वय :३०

शिक्षण-व्यवसाय :  पास , मोटर चालाक आणि मालक  ॐ साईं टूर्स एंड ट्रावेल्स

कोणत्या विषयावर ब्लॉग लिहिता?  : ट्रेक वर

वाचकांचा प्रतिसाद : समधानकारक

ब्लॉगिंगआधी लेखन करीत होता का? नाही

किती वर्षांपासूक ब्लॉगिंग करीत आहात? ३ वर्षे

ब्लॉगिंगच्या भवितव्याबद्दल : हो नक्कीच छान आहे

## ३. विशाल विजय कुलकर्णी

ब्लॉगचे नाव :‘ऐसी अक्षरे मेळविन.

http://magevalunpahtana.wordpress.com/

वय :३८

शिक्षण-व्यवसाय : इंजीनीअरींग , नोकरी

कोणत्या विषयावर ब्लॉग लिहिता? ललित साहित्य, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी, कथा, कविता, प्रवासवर्णने, क्रीडा

वाचकांचा प्रतिसाद : उत्तम आणि संतुलीत

ब्लॉगिंगआधी लेखन करीत होता का? होय. अजुनही करतो. वर्तमानपत्रे, मासिके ई.

किती वर्षांपासूक ब्लॉगिंग : गेली ३ वर्षे

ब्लॉगिंगच्या भवितव्याबद्दल : इंटरनेट ही नव्या मनुची, नव्या पिढीची भाषा आहे. पेपर मिडीया दिवसें दिवस कमी होत चाललाय. अशा परिस्थीतीत ब्लॉगींग हीच नव्या जगाची भाषा ठरली, बनली तर त्यात नवल वाटू नये आणि ते होणारच आहे. आंतरजालाच्या माध्यमातून खुप नवे नवे विचार अगदी सहज एकमेकांपर्यंत पोहोचवणे सोपे होत चाललेय. त्यामुळे ब्लॉगींगचे भवितव्य उज्वलच आहे यात शंकाच नाही.

विशाल विजय कुलकर्णी

३०२, शिवकृपा को.ऑ. हौ.सो., प्लॉट क्र. १४०,

सेक्टर१३ , खारघर. नवी मुंबई-४१०२१०

भ्रमणध्वनि क्रमांक : ९९६७६६४९१९

vkulkarni.omnistar@gmail.com

## ४. सौ. कांचन फिरदोस कराई

ब्लॉगचे नाव: मोगरा फुलला http://www.mogaraafulalaa.com व ब्लॉगवाले http://www.blogwale.info

वय: ३७

व्यवसाय: डबिंग (व्हॉईस ओव्हर)

कोणत्या विषयावर ब्लॉग : दीर्घकथा, चित्रपट परिक्षण, सामाजिक व राजकीय घडामोडींविषयक लेखन (मोगरा फुलला या ब्लॉगवर) व ब्लॉगिंगविषयक तांत्रिक आणि विशेष माहिती (ब्लॉगवाले या ब्लॉगवर)

वाचकांचा प्रतिसाद : समधानकारक

ब्लॉगिंगला सुरुवात करण्याआधीअ लेखन : होय

किती वर्षांपासूक ब्लॉगिंग : अडीच वर्षांपासून.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संपूर्ण व विनामूल्य लाभ जिथे घेता येतो असे ब्लॉग हे व्यासपिठ आहे. सामान्य व्यक्तीमधील असामान्यत्वाची प्रचिती इथे चटकन येते. ब्लॉगवरील एका छोट्याशा लेखाने समाजामधे उल्लेखनीय क्रांति घडून येते. वृत्तपत्र किंवा इतर प्रसारमाध्यमांकडून एखाद्या गोष्टीची दखल न घेतली गेल्यास ब्लॉगवर आपले गाऱ्हाणे विस्तृतपणे मांडता येते, इतकेच नव्हे तर लेखक, कवी, चित्रकार, छायाचित्रकार यांना स्वत:च्या साहित्याची व कलेची माहिती देण्यासाठी ब्लॉगिंग हे उत्तम माध्यम ठरले आहे. भविष्यात अधिकाधिक लोक स्वत:ला व्यक्त करण्यासाठी ब्लॉगिंगचा आधार घेणार आहेत यात शंका नाही.

## ५. प्रकाश लालासाहेब पोळ

ब्लॉगचे नाव :सह्याद्री बाणा http://www.sahyadribana.com/

वय २३ वर्षे

शिक्षण-व्यवसाय : M. Sc. Biotech 1st

कोणत्या विषयावर ब्लॉग : मी प्रकाश पोळ. तथागत बुद्धापासून ते फुले-शाहू-आंबेडकर आणि बळीराजापासून ते छ. शिवराय यांच्या विचारानुसार जीवन जगणारा एक बहुजन तरुण. देव-धर्मासारख्या भाकड गोष्टींवर माझा विश्वास नाही. ज्यानी

शोषितांच्या लढ्याला बळ दिले ते सर्व महापुरुष माझ्या दृष्टीने देवापेक्षा श्रेष्ठ आहेत. सह्याद्री बाणा हा ब्लॉग म्हणजे आजवर ज्या माणसांनी बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य खर्ची घातले त्या महापुरुषांचा वारसा पुढे न्यायचा हा छोटासा प्रयत्न.

वाचकांचा प्रतिसाद अतिशय उत्तम आहे.

माझ्या सह्याद्री बाणा या ब्लॉगला पाच महिन्यात २ लाख वाचकांनी भेट दिली.

ब्लॉगिंगआधी लेखन : होय. ब्लॉग सुरु करण्याआधी तीन वर्षे दै. लोकमत, दै. पुढारी, दै. पुण्यनगरी, दै. प्रीतिसंगम (कराड), दै. ग्रामोद्धार (सातारा) या वृत्तपत्रातून लिखाण

करत होतो.

किती वर्षांपासूक ब्लॉगिंग :२००७पासून

ब्लॉगिंग भवितव्याबद्दल : ब्लॉगिंग ला अतिशय चांगले भवितव्य आहे. ब्लॉग हे माध्यम सहज उपलब्ध होणारे व जलदगतीने सर्वांपर्यंत पोहचणारे आहे. तसेच ब्लॉग च्या

माध्यमातून आपले विचार जसेच्या तसे मांडता येतात. त्यामुळे बरेच लोक आपले विचार मांडण्यासाठी ब्लॉग ला पसंती देतात. परंतु ब्लॉगर नां सहाय्य करण्यासाठी किंवा त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी अधिकृत अशी व्यवस्था नाही.

प्रकाश लालासाहेब पोळ, पत्ता- मु. पो. ओंड, ता. कराड, जि. सातारा. ४१५१११

मोबा. ९६६५३३१९१०

## ६. गंगाधर महादेवराव मुटे

ब्लॉगचे नाव :रानमोगरा - वांगंमय शेती ते वांङ्मय शेती http://gangadharmute.wordpress.com

रानमेवा- प्रकाशित काव्यसंग्रह http://ranmewa.blogspot.com
शेतकरी विहार, बळीराजा, शेतकरी संघटना, वर्धा, मार्ग माझा वेगळा

वय : ४८

शिक्षण-व्यवसाय : बि.एस.सी (गणित) शेती

कोणत्या विषयावर ब्लॉग : मुख्य विषय शेती, काव्य, ललितलेखन या स्वरुपात.

वाचकांचा प्रतिसाद : खूपच समाधानकारक

ब्लॉगिंगआधी लेखन :होय. पण तुरळक प्रमाणात. ब्लॉगींगमुळेच हवे त्या तऱ्हेने व्यक्त व्हायची संधी मिळाली.

किती वर्षांपासूक ब्लॉगिंग : दिड वर्षापासून.

ब्लॉगिंग भवितव्य :- ब्लॉगिंगला उज्वल भवितव्य आहे. आज ना उद्या सर्वांना ब्लॉगिंगची दखल घ्यावीच लागेल. लोकशाहीचा पाचवा आणि मुख्य आधारस्तंभ म्हणून ब्लॉगिंगला महत्व येण्याची चिन्हे आहेत. त्यासोबतच जनसामान्यांचे प्रश्न अधिक प्रभावीपणे व्यक्त करण्याचे आणि निरंकुश सत्तेला अंकुश लावण्याइतपत ताकद या ब्लॉगिंगमध्ये आहे, असे माझे ठाम मत आहे.

स्टारमाझा टीव्ही ने घेतलेल्या ब्लॉगमाझा स्पर्धेत माझ्या रानमोगरा - वांगंमय शेती ते वांङ्मय शेती. या ब्लॉगला पारितोषक मिळाले आहे.

९७३०५८२००४

## ७. अतुल कडलग

http:/kharadpatti.wordpress.com

वय :२५

शिक्षण-व्यवसाय : नौकरी

कोणत्या विषयावर : कोणताही

वाचकांचा प्रतिसाद : समाधानकारक

ब्लॉगिंगआधी लेखन : हो

किती वर्षांपासूक ब्लॉगिंग : ६ महिने

ब्लॉगिंग भवितव्य : ब्लॉगला भवितव्य निश्चितच चांगले आहे...जसा जसा इंटरनेटचं प्रसार होत आहे तसा -तसा लोक ब्लॉग वाचत आहेत...

ac.kadlag@gmail.com

# ८. महेंद्र कुलकर्णी

ब्लॉगचे नाव : काय वाटेल ते

वय :५०

शिक्षण-व्यवसाय : इंजिनिअर, नोकरी

कोणत्या विषयावर : ठराविक विषय नाही, कुठल्याही विषयावर लिहितो. अगदी साहित्य ते राजकीय

वाचकांचा प्रतिसाद कसा वाटतो? समधानकारक

ब्लॉगिंगआधी लेखन : होय

किती वर्षांपासूक ब्लॉगिंग : २ वर्ष

ब्लॉगिंग भवितव्य : हळू हळू बाळसं धरू लागलंय मराठी ब्लॉग विश्व. मी दोन वर्षापूर्वी ब्लॉग लिहिणे सुरु केले तेंव्हा फक्त ८००ब्लॉग होते , आज तेच जवळपास २ हजारच्या वर आहेत. माझ्या ब्लॉग चा अनुभव:-. नविन लेख पोस्ट केल्याच्या दिवशी ब्लॉग वर कमीत कमी हजार तरी लोकं येतात, इतर दिवशी जवळपास ८०० लोक भेट देतात. याचा अर्थ असा की लोकांना वाचायला आवडतं . ब्लॉग वरचे बरेच लेख नियतकालीकात पण प्रसिद्ध झाले आहेत. लोकमत मधे नियमित प्रसिध होतात. ब्लॉगिंग मुळे नविन लोकांचे नविन शैलीचे लेखन वाचायला मिळते, आणि मला वाट्तं की हीच खरी ब्लॉगिंगची शकती स्थळ आहे.

http://kayvatelte.com

९८२०६०५३८१

# ९. जयदीप गणेश भोगले

ब्लॉगचे नाव : jdchivadi.blogspot.com

वय :.....३२....

शिक्षण-व्यवसाय : अभियंता नोकरी

कोणत्या विषयावर ब्लॉग : मराठी कथा, कविता, समीक्षा, मालिकांसाठी लेखन.

वाचकांचा प्रतिसाद : समाधानकारक

ब्लॉगिंगआधी लेखन : होय

किती वर्षांपासून : जुलै २०१०

ब्लॉगिंग भवितव्य : ब्लॉग हे जसे जसे इंटरनेट व्यापक होत जाईल अधिक व्यापक होईल. गूगल काही दिवसात मराठी व भारतीय भाषांमंध्ये ॲडसेन्स चालू करून एक उत्पन्नाचे साधन निर्माण करेल. आणि तो एक समृद्ध ब्लोग्विश्वसाठी वरदान ठरेल. कदाचित एक नवीन साहित्य आणी इ साहित्यिक या प्रयत्नातून निर्माण होतील. बाकी वाढता वाढता भेदिले शून्य मंडळा हे आपण जाणताच.

# १०. डॉ. गोपाल मेघश्याम सावकार

ब्लॉगचे नाव : gsawkar.blogspot.com, gopalsawkar.blogspot.com

वय : ३७ वर्षे

शिक्षण-व्यवसाय : वैद्यकीय

ब्लॉग विषय : आयुर्वेद, ललित

वाचकांचा प्रतिसाद : समधानकारक

ब्लॉगिंगला सुरुवात करण्याआधीही लेखन करीत होतो.

३ वर्षांपासूक ब्लॉगिंग करीत आहे.

ब्लॉगिंगच्या भवितव्याबद्दल आपले मत : इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या वाढली तर उपयोगी.

# ११. चेतन विलास होले

chetannblogspot.com

वय :२३

शिक्षण-व्यवसाय : student. (ty.bca).......

कोणत्या विषयावर ब्लॉग लिहिता? : खर सांगायला गेले तर मला bolg या विषयाचा स्वतःसाठी अभ्यास करायचा होता..तसे मी लिहितो लेख, कविता..पण ब्लॉग लिहावा एवढं मी अजून काहीच मिळवलेल नाहीये.

वाचकांचा प्रतिसाद कसा वाटतो? : बरा....काही वाचतातही, पण त्यांचे comments येत नाहीत तोपर्यंत माझ्यासाठी ते त्यांनी फक्त पाहिलं अन् पुढे गेले अस आहे.

ब्लॉगिंगला सुरुवात करण्याआधी लेखन करीत होतो.

ब्लॉगिंगला आताच सुरु केलेय, अन् तेही नेहमी शक्य नाही होत....

ब्लॉगिंगचे भवितव्य : खूप छान आहे अन् सर्वांसाठी उपयुक्त. आपले विचार मांडणे...आवश्यक आहे अन् ते हे व्यासपीठ आहे.

## १२. शंतनू देव

ब्लॉगचे नाव : माणिक मोती

वय :३२

शिक्षण-व्यवसाय : संगणक अभियंता

लेखन: ललित + कविता + गाणी

वाचकांचा प्रतिसाद - उत्तम.

ब्लॉगिंगला सुरुवात करण्याआधी लेखन करीत नव्हतो.

दीड वर्षांपासूक ब्लॉगिंग करीत आहे.

ब्लॉगिंगचे भवितव्य खूप उज्ज्वल आहे .

http://manik-moti.blogspot.com/
http://maplechipaane.blogspot.com/

## १३. आशिष अनंत सावंत

ब्लॉगचे नाव : sawantashish.blogspot.com, mytourdiary.blogpsot.com, onesketchbook.blogspot.com, onephotoalbum.blogspot.com

वय :३०

शिक्षण-व्यवसाय : B. Com, Banking

असा कुठलाच विषय नाही ज्यावर लिहायला आवडत नाही.

वाचकांचा प्रतिसाद बरा. मिळो अथवा न मिळो लिहीत राहायचे.

ब्लॉगिंगला सुरुवात करण्याआधी लेखन करीत फक्त परीक्षेमध्ये.

२ वर्षांपासूक ब्लॉगिंग करीत आहात.

ब्लॉगिंगचे भवितव्य खूप उज्ज्वल आहे. जो पर्यंत इंटरनेट आहे तो पर्यंत राहील.

१४. **विक्रम चंद्रकांत घाटगे**

ब्लॉगचे नाव - जीवनमूल्य

वय - २९

शिक्षण-व्यवसाय - औषध विक्रेता

सामाजिक विषयावर ब्लॉग लिहितो.

वाचकांचा प्रतिसाद समाधानकारक वाटतो.

ब्लॉगिंगला सुरुवात करण्याआधी लेखन करीत नव्हतो.

२ वर्षांपासूक ब्लॉगिंग करीत आहे.

ब्लॉगिंग ला नक्कीच उत्तम भवितव्य आहे. या माध्यमातून सामान्य माणूस आपले विचार मांडू लागला आहे. आणि याचा व्याप जसजसा वाढेल तसे वर्तमानपत्रांपेक्षा जास्त वाचक ब्लोगवर विश्वास ठेवतील.

९४२३२३२३१३

http://jivanmulya.blogspot.com/

**समाप्त**